रजि.नं.एफ-२१७(नांदेड)

स्थापना जून १९७२

सुवर्ण महोत्सव वर्ष 52 Years

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच एकमेव ध्यास



हु.गो.पानसरे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# पानसरे महाविद्यालय, अर्जापूर

ता. बिलोली जि. नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित





# माहिती पुस्तिका

## PROSPECTUS

E-mail : pmarjapur@gmail.com Website : www.pmarjapur.org.in 09552129568 02465-295438

## कृतज्ञ स्मृती



हु.गोविंदराव पानसरे



कै.ॲड. बी.एस.बिलोलीकर
संस्थापक अध्यक्ष



कै.जे.जी.अंबेकर
संस्थापक

## विद्यमान संचालक मंडळ



श्री मनोहरराव माधवराव देशपांडे
अध्यक्ष



श्री नागनाथराव संतुकराव पाटील सावळीकर
उपाध्यक्ष



श्री राजेश्वर गोविंदू उत्तरवार
उपाध्यक्ष



श्री सुनिल रमाकांत बेजगमवार
चिटणीस

# विद्यमान संचालक मंडळ



श्री ॲड. गंगाधरराव महाळप्पा पटने
सदस्य



श्री बाळोजी गंगाराम पाटील
सदस्य



श्री सुभाष लक्ष्मणराव गायकवाड
सदस्य



प्रा. श्री माधवराव हणमंतराव पाटील
सदस्य



श्री डॉ. श्रीधर व्यंकटेश जामकर
सदस्य



श्री नरेश पोशट्टी सब्बनवार
सदस्य



श्री ओमप्रकाश रामराव अर्जुने
सदस्य



श्री साईनाथ गुंडय्या दाचावार
सदस्य



प्रा.डॉ.अशोक हुल्लाजी श्रीरामे
प्राचार्य, पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
पदसिध्द सदस्य

# संस्था व्यवस्थापन समिती


श्री मोहन राजेंद्र दमकोंडवार
अध्यक्ष


श्री राजकिशोर शंकरराव दाचावार
सहसचिव


श्री साईनाथ गोविंदू उत्तरवार
सदस्य


श्री चंद्रशेखर नागनाथ बेजगमवार
सदस्य


श्री श्रीनिवास सय्याराम सब्बनवार
सदस्य


श्री संजय तुकाराम हमंद
सदस्य


श्री म.अहेमद म. गौस
सदस्य


श्री सादिक हन्नुमियॉ
सदस्य


श्री नागेश गंगाधर नवाथे
सदस्य


श्री साईनाथ व्यंकटी बाभळीकर
सदस्य


श्री गंगाधर नागनाथ कोंडावार
सदस्य


श्री मनोज रामनिवास आसावा
सदस्य


श्री शंकर राजेंद्र दमकोंडवार
सदस्य

# शालेय व्यवस्थापन समिती (कनिष्ठ महाविद्यालय)



श्री प्रदीप जयराम अंबेकर
अध्यक्ष



श्री सुनिल रमाकांत बेजगमवार
सदस्य



श्री राजेश्वर गोविंदू उत्तरवार
सदस्य



श्री नारायण ज्ञानोबा गाडवे
पर्यवेक्षक
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर



श्री ओमप्रकाश रामराव अर्जुने
सदस्य, शिक्षकेत्तर प्रतिनिधी



प्रा.डॉ.अशोक हुल्लाजी श्रीरामे
प्राचार्य
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
पदसिध्द सचिव

सुवर्ण महोत्सव वर्ष
50 Years

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच एकमेव ध्यास

यत्न तो देव जाणावा
पानसरे महाविद्यालय
अर्जापूर ता.बिलोली जि. नांदेड



स्थापना जून १९७२

# पानसरे महाविद्यालय

अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड

**Vision :**

Commitment to the all round development of rural students to provide ` quality education

**Mission:**

1. To provide the rural students of nation with power of knowledge to face the future challeges to make them responsible citizen of India.
2. To faciliate high tech quality education to rural students.
3. To promote an environment of academic excellence through development of human potentials.
4. To develop innovative teaching, learning and research to update and upgrade the students with time
5. To generate the quality manpower to be absorbed in social, political and economic development of the nation

|| सा विद्या या विमुक्तये ||

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

# Certificate of Academic and Administrative Audit

I am directed to inform that:

The Academic Council of the University, on the recommendation of the duly constituted Committee for Academic and Administrative Audit as per the Maharashtra Public Universities Act, 2016, is pleased to declare that **Pansare Mahavidyalaya Arjapur, Tq Biloli Dist Nanded** has been audited during the academic year 2019-20. The score obtained by the said college/institute is as given below:

| Sr. No. | Criteria | Maximum Score | Obtained Score | Percentage of score |
|---|---|---|---|---|
| 01. | Governance and Policy Making | 40 | 12 | 30.00 |
| 02. | Infrastructure and Student Amenities | 220 | 130 | 59.09 |
| 03. | Management of Finance | 40 | 07 | 17.50 |
| 04. | Administrative Criteria | 60 | 56 | 93.33 |
| 05. | Academic Criteria | 180 | 112 | 62.22 |
| 06. | Socio-Economic Criteria | 20 | 20 | 100.00 |
| | **Total** | 560 | 357 | 63.75 |

The college has received overall **Grade 'B'** with **63.75%**

This Certificate is valid up Jun 19, 2023

Deputy Registrar
(Affiliation Section)

Place: Nanded
Date : Jun 20, 2020

REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

**हार्दिक अभिनंदन** महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी – विद्यार्थीनीचे **हार्दिक अभिनंदन**

पानसरे महाविद्यालयाला यशाची मोठी परंपरा असून आमच्या महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्व विकासावरही भर देण्यात येतो. त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासाच्या दृष्टीकोनातून विशेष प्रयत्न केला जातो. या परंपरेला साजेल असा निकाल जुन–जुलै २०२३ चे घोषित झाले आहेत.

## बारावी (कला) जुन-जुलै २०२३

**प्रथम**




लाखे संदेश नबाजी
बारावी कला शाखा

**व्दितीय**




पेंटेवार शितल लिंगुराम
बारावी कला शाखा

**तृतीय**




गायकवाड आरती चांदराव
बारावी कला शाखा

## बारावी(वाणिज्य) जुन-जुलै २०२३

**प्रथम**




कोरडवार अंकिता हाणमल्लू
बारावी वाणिज्य शाखा

**व्दितीय**




शेख रिझवान अहमद
बारावी वाणिज्य शाखा

**तृतीय**




जाधव निकीता अशोक
बारावी वाणिज्य शाखा

## बारावी (विज्ञान) जुन-जुलै २०२३

**प्रथम**




मिर्झा अब्दुल गफार बेग
मिर्झा मुखीद बेग
बारावी विज्ञान शाखा

**व्दितीय**




फारूखी आयशा अजमद
बारावी विज्ञान शाखा

**तृतीय**




आतिफा अमिम मोहम्मद
जियाऊद्दीन इरफान
बारावी विज्ञान शाखा

**B.A. & B.Com.**

बी.ए. व बी.कॉम चा निकाल प्रिटींगच्या दृष्टीकोनातून वेळेवर न लागल्यामुळे देण्यात आले नाहीत.

# महाविद्यालतील राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम



क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे आयोजित आव्हान २०२२ शिबिरासाठी निवड झालेल्या कृष्णा रामगिरवार चे अभिनंदन करताना संस्थेचे अध्यक्ष मनोहरराव देशपांडे साहेब..



संस्थेचे उपाध्यक्ष मा. नागनाथ पाटील सावळीकर, प्राचार्य डॉ.अशोक श्रीरामे, डॉ. अकाश पवार यांच्या हस्ते रक्तदानाचे प्रमाणपत्र स्वीकारताना डॉ शिंदे पी. बी.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सचिव मा.सुनील शेठ बेजगमवर साहेब मार्गदर्शन करताना...



रासेयो ची स्वयंसेविका कु. गायत्री मंडगे विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेत पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ उध्दव भोसले, प्र–कुलगुरु डॉ जोगेंद्र सिंह बिसेन यांच्या हस्ते स्वीकारताना..




रासेयो विभाग पानसरे महाविद्यालय अर्जापुर आणि डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेचे प्रमाणपत्र स्वीकारताना प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे...




विद्युत बचत व विद्युत संवर्धनाची शपथ घेताना शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष प्रदीप जी आंबेकर, प्राचार्य, कार्यालयीन अधीक्षक आणि रासेयो स्वयंसेवक.



आजादी की मशाल यात्रेच्या उद्घाटन प्रसंगी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष नागनाथ पाटील सावळीकर, राजेश्वर शेठ उत्तरवार, प्राचार्य डॉ. गवई, प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे आदी..



डॉ. मदनुरे डॉ कदम रक्तदान करताना सोबत रासेयो प्रमुख डॉ जाधव डी. बी. व विभागीय समन्वयक डॉ प्रकाश शिंदे...



आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत मशाल रॅलीचे विद्यापीठ प्रतिनिधी डॉ मदनुरे व्ही. के. आणि डॉ शिंदे पी. बी. सोबत महाविद्यालयाचा स्वयंसेवक गणेश राचोटकर.




महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय बिलोली यांच्या वतीने आयोजित नवीन मतदार नोंदणी कार्यशाळेत बोलताना नायब तहसीलदार...



आजादी का अमृत महोत्सव मशाल रॅलीचे यशस्वी प्रतिनिधीत्व केल्याबद्दल प्राचार्य डॉ. गवई सर व डॉ अभिमन्यू पाटील स्वयंसेवक श्रीकांत कसलोड चा सत्कार करताना..




संविधान गौरव दिनानिमित्त संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आर. जे. गायकवाड..




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त त्यांना अभिवादन करताना प्राचार्य आणि महाविद्यालयातील प्राध्यापक.



महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उत्स्फूर्त रक्तदान करताना सोबत डॉ गोविंद चौधरी..




महाविद्यालयातील परिसर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी राबविलेल्या उपक्रमात रासेयो स्वयंसेवक आणि कार्यक्रमाधिकारी..

# महाविद्यालतील राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम




रासेयो विशेष वार्षिक शिबिराच्या समारोप प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.मनोहरराव देशपांडे साहेब, उपाध्यक्ष मा.नागनाथ पाटील सावळीकर, मा.राजेश्वर सेठ उत्तरवार, प्राचार्य डॉ. ए.एच. श्रीरामे, कार्यक्रमाधिकारी आणि स्वयंसेवक..



मौजे कार्ला खुर्द येथील शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करतानाचे क्षण चित्र..




रासेयो विशेष वार्षिक शिबिराच्या समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे माननीय दिलीप कुलकर्णी यांचा सत्कार करताना कार्यक्रमाधिकारी डॉ. देविदास जाधव..




डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयास ग्रंथ भेट देताना रासेयो कार्यक्रमाधिकारी आणि स्वयंसेवक...



महाविद्यालयातील रासेयो विभाग आणि व्हेगन आउटरिच आंतरराष्ट्रीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय ऑनलाइन वेबिनार चे आयोजन..



मौजे कार्ला येथे सात दिवसीय विशेष वार्षिक शिबिरामध्ये संस्थेचे उपाध्यक्ष मा. राजेश्वर शेठ उत्तरवार यांनी दिलेल्या १५० रोपट्याची लागवड करताना..




अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर येथे सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रशिक्षणात कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश शिंदे..



रासेयो विशेष वार्षिक शिबिराच्या समारोप प्रसंगी अनुभव व्यक्त करताना कृष्णा रामगिरवार...



रासेयो विशेष वार्षिक शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमात शिबिराचे प्रास्ताविक करताना विभागीय समन्वयक डॉ. प्रकाश शिंदे.




संविधान गौरव दिनानिमित्त उद्देश पत्रिकेचे वाचन करून शपथ घेताना महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी..




राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाच्या निमित्ताने प्रा शंकर मरकले यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन..



विशेष शिबिराच्या समारोप प्रसंगी भोजनाचा आनंद घेताना स्वयंसेविका समवेत प्रा. जी. टी. इरबतनवाड..



रासेयो विशेष वार्षिक शिबिरात श्रमदान करताना स्वयंसेवक सोबत रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. जाधव डी. बी....




राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित काव्यवाचन स्पर्धेचे पारितोषिक डॉ. ममता इंगोले यांच्या हस्ते स्वीकारताना स्वयंसेविका कावेरी काळे..



आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान आयोजित तिरंगा रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि विद्यार्थी.

# महाविद्यालतील विविध उपक्रम



पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात प्रमुख अतिथी मा. डोईफोडे एम.ए. पोलीस निरीक्षक यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे, संचालक प्रकाश पा. अर्जुने, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. शंकर मरकले.



मा. डोईफोडे एम.ए. यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्वीकारतांना विद्यार्थीनी व मान्यवर.



संस्था संचालक श्री प्रकाश पा. अर्जुने यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्वीकारतांना विद्यार्थीनी व मान्यवर.



पदवी प्रमाणपत्र समारंभ प्रसंगी विद्यापीठध्वज संचलन मा.एम.ए.डोइफोडे, पोलीस निरीक्षक, प्राचार्य डॉ. श्रीरामे, संस्था संचालक मा. प्रकाश पा. अर्जुने, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. शंकर मरकले व प्राध्यापक



पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात उपस्थित विद्यार्थी



संस्था संचालक श्री प्रकाश पा. अर्जुने यांच्या हस्ते परीक्षा विभाग प्रमुख प्रा. शंकर मरकले यांचा सत्कार करतांना.



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त उद्घाटनपर मनोगत व्यक्त करतांना प्रमुख पाहूणे मा.कल्याण गायकवाड, प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे, मराठी विभाग प्रमुख डॉ. सिध्दोधन कांबळे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आर.जे.गायकवाड, श्री प्रकाश पाटील अर्जुने व विद्यार्थी



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पुजन व अभिवादन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद व प्रशासकीय कर्मचारी.



कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी येथील राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम पारितोषीक स्वीकारतांना कृष्णा रामगीरवार व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रामचंद्र गायकवाड



कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी येथील राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम व व्दितीय पारितोषीक स्वीकारतांना कृष्णा रामगीरवार आणि कु.नक्षत्रा गाजेवार व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.रामचंद्र गायकवाड




श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर येथील मराठवाडास्तरीय निबंध लेखन स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळविल्याबद्दल कु.पुजा मामीडवारचे सत्कार करतांना प्राचार्य डॉ.अशोक श्रीरामे, मराठी विभाग प्रमुख सिध्दोधन कांबळे व प्राध्यापक वृंद



जागतीक कविता दिवसाच्या निमित्ताने बाळासाहेब सावंत कोकन कृषी विद्यापीठ दापोली येथील प्राध्यापक डॉ. आनंद नरंगलकर विद्यार्थ्यांशी सवांद साधतांना



मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त आयोजीत कविसंमेलनातील निमंत्रीत कवी, पारितोषीक प्राप्त विद्यार्थी, प्राचार्य आणि प्राध्यापक वृंद.



कु. प्रणिता पटवेकर विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरु डॉ उध्दव भोसले, प्र-कुलगुरु डॉ जोगेंद्र सिंह बिसेन यांच्या हस्ते स्वीकारताना..



नैपुण्य भित्तीपत्रकाचे प्रकाशन मा.कल्याण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य अशोक श्रीरामे, मराठी विभागातील प्राध्यापक व संपादक मंडळातील विद्यार्थी.

# क्रीडा विभाग



पानसरे महाविद्यालय आयोजीत क्रॉस कंट्री मुले व मुली स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभास प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे सायन्य कॉलेज प्राचार्य डॉ. गवई सर, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार यांच्या प्रमुख उपस्थितीत.



प्रणव आडबलवार व प्रशांत देशपांडे यांची पश्चिम विभागीय टेबल टेनिस आर.जी.पी.व्हि.भोपाळ येथे निवड.



पश्चिम विभागीय बॅडमिंटन (IUT) विद्यापीठामार्फत समन्वयक म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मा. कुलगुरू डॉ. उध्दव भोसले यांच्याहस्ते सत्कार



विष्णु लव्हाळे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री क्रीडा विद्यापीठ चेन्नई येथे निवड.



करूणा गाडे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पावर लिफ्टींग केंद्रीय विद्यापीठ हिमाचल प्रदेश येथे निवड.




प्रषिक चित्ते व संघर्ष सोनकांबळे यांची सेंट्रल झोन स्विमींग स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप विजेते. तसेच अखिल भारतीय स्पर्धेसाठी निवड.



मारोती वडजे यांना सेट्रल झोन १५०० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक.




युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभास संस्थेचे अध्यक्ष श्री मनोहरराव देशपांडे, सचिव श्री सुनिल बेजगमवार, संचालक श्री सुभाष गायकवाड, शा.व्य.स.अध्यक्ष श्री प्रदिप आंबेकर प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे व इ.



दुर्गेश सुर्यवंशी यांचे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेट लिफ्टींग स्पर्धेत चंदीगड येथे निवड.



विष्णु लव्हाळे यांना ५००० मीटर रनिंग स्पर्धेत सुवर्णपदक.



विष्णु लव्हाळे यांची सेट्रल झोन क्रॉस कंट्री १० किमी रनिंग स्पर्धेत द्वितीय स्थान.



पानसरे महाविद्यालय आयोजीत क्रॉस कंट्री मुले व मुली स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभास प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे सायन्य कॉलेज प्राचार्य डॉ. गवई सर, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार यांच्या प्रमुख उपस्थितीत.



खुशाली गांगुर्डे व करूणा गाडे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला वेट लिफ्टींग कालिकत विद्यापीठ येथे निवड.



पानसरे महाविद्यालय आयोजीत क्रॉस कंट्री स्पर्धेतील सहभागी खेळाडु.



शेख जमीर यांना सेट्रल झोन मधील हतोडा फेक स्पर्धेत सुवर्णपदक

# क्रीडा विभाग




युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे
बक्षीस वितरण समारंभ.



महाविद्यालय आयोजीत क्रॉस कंट्री स्पर्धेत
जनरल चॅम्पियनशिप (मुली).



युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन..
महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक,
प्रशासकीय कर्मचारी व खेळाडु



पानसरे महाविद्यालय येथे जागतिक योगा दिवस साजरा.
प्राचार्य व प्राध्यापक कर्मचारी योगा करते वेळेस..



महाविद्यालय आयोजीत क्रॉस कंट्री स्पर्धेत
विष्णु लव्हाळे यांना सुवर्णपदक व
पानसरे महाविद्यालय (मुले) यांना जनरल चॅम्पियनशिप.




युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ.



युवा स्पंदन १०० मीटर धावणे स्पर्धा (मुली)



युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडुंना शुभेच्छा देतेवेळेस
कार्यालयीन अधिक्षक श्री राजु लाभशेटवार, डॉ. सिध्दोधन कांबळे,
श्री गोविंद चौधरी व खेळाडु



युवा स्पंदन कबड्डी स्पर्धा (मुली).



हर घर तिरंगा अभियान अंतर्गत तिरंगा रॅली.



युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धा क्रिकेटचे उद्घाटन करतेवेळेस
प्राचार्य डॉ. अशोक श्रीरामे, प्रा.डॉ.गोजे, प्रा.मदनुरे,
प्रा.डॉ. सय्यद ए.आर., प्रा. येलमे, क्रीडा संचालक डॉ. वाकरडकर



पानसरे महाविद्यालय येथे जागतिक योगा दिवस साजरा.



युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडुंना
शुभेच्छा देतेवेळेस प्राचार्य व क्रीडा संचालक



प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयात ध्वजारोहन प्रसंगी
प्रास्ताविकेचे वाचन करते वेळेस संस्थेचे पदाधिकारी ,
महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी




युवा स्पंदन अंतर्गत क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना
बक्षीस वितरण प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी,
प्राचार्य व क्रीडा संचालक

## महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची

# यशोगाथा

पानसरे महाविद्यालयाची स्थापना १९७२ साली झाली. तेव्हापासून ते आजपर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये नैपुण्य मिळवित असून ते स्वावलंबी बनले आहेत. अनेक विद्यार्थी न्यायाधीश, यशस्वी वकील, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, महसूल अधिकारी, सक्षम पोलिस अधिकारी, शिक्षक व भारतीय सैन्य दलात कार्यकरत आहेत. मागील चार वर्षात यश संपादन केलेले काही विशेष विद्यार्थी.



Gangadhar Gaikwad
PSI



Laxmi Malkuwar
PSI



Akash Biloilikar
ARMY



Arshewar Waddena Shivling
PSI



Ram Mundkar
CRPF (Center Reserve Police Force)



Madhav Ramrao Ibitwar
SRPF (Maharashatra Reserve Police Force)



Ramchandra Aagmankar
TAX ASSISTANT



Mahavir Thakur
ARMY



Bodhke Santosh
ARMY



Shaikh Shahin
NET HINDI

# प्राचार्यांचे मनोगत

विद्यार्थी मित्र मैत्रीणींनो,

सन २०२३–२०२४ या नवीन शैक्षणिक वर्षात पानसरे महाविद्यालयाच्या वतीने आपले मनःपुर्वक स्वागत. मागील शैक्षणिक वर्षात मिळविलेल्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन. आपल्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात नेहमीच नवे स्वप्न, नवी उमेद, उद्दिष्टांचे उंच नवे शिखर गाठण्यासाठीच होत असल्यामुळे त्याला प्रोत्साहन देण्यासाठी योग्य संकल्प आणि नियोजनाची आवश्यकता असते. हाच शुध्द हेतू मनाशी बाळगून महाविद्यालयात येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन उपक्रमाची सुरूवात करण्याचा निश्चय आम्ही केला आहे.

पानसरे महाविद्यालयाने १९७२ पासून पंचवीस एकरच्या निसर्गरम्य परिसरातून नेत्रदीपक व दमदार शैक्षणिक वाटचाल केली आहे. अनेक शैक्षणिक, सामाजिक संकल्प पूर्ण केले आहेत. नवीन अभ्यासक्रम, पायाभूत अध्ययन–अध्यापनाचा विस्तार, अध्यापनातील नियमितता, सर्वसोयींनी युक्त अशी इमारत, सुसज्ज ग्रंथालय, अद्ययावत अभ्यासिका, विद्वतजनांची व्याख्याने, तज्ञ व व्यासंगी प्राध्यापकांच्या नियुक्ती, परीक्षा पध्दतीतील सुधारणा, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील वैशिष्टपूर्ण संपादणूक, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, गुणवत्तावर्धक शिक्षण व विद्यार्थ्यांचा मूल्यात्मक विकास असे ध्येय उराशी बाळगून आजवर राबवलेले हे उपक्रमशिल अभियान येणाऱ्या शैक्षणिक वर्षात अधिक पुढे घेऊन जाण्याचा आमचा मानस आहे.

मित्रांनो, २१ व्या शतकातील अनेक स्पर्धात्मक आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत. हे युग संगणकाचे, जागतिकीकरणाचे व अद्ययावत ज्ञानसंपादनाच्या स्पर्धेचे आहे. याच पार्श्वभूमीवर उच्चशिक्षणात अनेक बदल होत आहेत. हे लक्षात घेऊन महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी  फेरनियोजनाचा निर्णयही घेतलेला आहे. स्पर्धात्मक वास्तवतेचा सामना करत उज्ज्वल भविष्याचा वेध घेण्यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून अनेक कोर्सेस, नव्या योजना, नवीन उपक्रम राबविले जाणार आहेत. ज्ञान, चारित्र्य आणि करुणा या त्रिसुत्रीचा संगम विद्यार्थ्यांचा शैक्षणिक जीवनात घडवून आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या शैक्षणिक वाटचालीत आपण सहप्रवाशी होऊन, मुल्यात्मक व गुणवत्तापूर्ण शिक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी सक्रिय व्हावे, असे आवाहन मी करतो.

नव्या युगाची पावले व स्वतःची जबाबदारी ओळखून महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विविध प्रस्ताव पाठविले आहेत. महाविद्यालयाचे आधुनिकीकरण करणे, विद्यार्थ्यांना इंटरनेटसह संगणकीकृत ग्रंथालय व संगणकीय तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्याचे महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सॉफ्टस्किल डेव्हलपमेन्ट, व्यक्तिमत्त्व विकास, संगीत, कला, क्रीडा याबाबतही अनेक योजना कार्यान्वित करण्यात येत आहेत. गॅदरींग सारखे पारंपरिक कालबाह्य खर्चिक व त्रासदायक कार्यक्रम बंद करुन, सांस्कृतिक विभागाच्या वतीने " युवास्पंदन " हा आनंददायी व ज्ञानवर्धक कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

उपलब्ध शैक्षणिक सामुग्री, तंत्रज्ञान व पंचवीस एकरच्या भौतिक निसर्ग रम्यतेबरोबरच अनेक सोयीसवलती उपलब्ध करुन देऊन विद्यार्थ्यांना गुणवत्तेकडे झेपावणारे नवे पंख देणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट असल्यामुळे या शैक्षणिक अभियानात आपला प्रतिसाद मोलाचा ठरणार आहे. आपण कृतीशील बनाल हीच अपेक्षा.

पुनःश्च एकदा आपले सहर्ष हार्दिक अभिनंदन आणि महाविद्यालयात स्वागत.

**डॉ.अशोक श्रीरामे**
**प्राचार्य**

## ADMINISTRATIVE OFFICE

**Principal**
Dr. Shrirame A. H.

**Supervisor**
Mr. Gadwe N.D.
(Junior College)

**Staff**

**Superintendent**
Mr. Laphshetwar R.S.

**Sr. Clerk**
Mr. Kuntalwar I.N.

**Jr. Clerk**
Mr. Manthale S.N.

**Information Authority**

Dr. Shrirame A. H.
(Appellate Authority)

Dr. Gaikwad R.J.
(Information Officer)

## OFFICE Hours

| | | |
|---|---|---|
| Monday to Saturday | : | 9.30 am. to 5.30 pm. |
| Lunch Break | : | 1.30 pm. to 2.00 pm. |

The College will remain closed on Sundays and Public Holidays.

## Library Hours : Issue/Return

| | | |
|---|---|---|
| Junior College | : | 10.00 am. to 5.00 pm. |
| Senior College | : | 10.00 am. to 5.00 pm. |
| Reading Hall | : | 9.30 am. to 5.00 pm. |

# 1 उपलब्ध अभ्यासक्रम, उपक्रम, सोयी व सवलती

**१.१) पानसरे महाविद्यालय :**

हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील पहिले हुतात्मा ठरलेल्या कै. गोविंदराव पानसरेंना २१ ऑक्टोबर १९४६ साली अर्जापूर येथे हौतात्म लाभले. केवळ ह्याच भागातील नव्हे तर अख्ख्या मराठवाड्यातील दीन दुबळ्या जनतेचे हु. पानसरे हे श्रध्दास्थान बनले आहेत. त्यांच्याच बलिदानापासून प्रेरणा घेऊन अर्जापूर- कुंडलवाडी- बिलोली परिसरातील शिक्षणप्रेमी नागरीकांनी जून १९७२ ला अर्जापूर येथे पानसरे महाविद्यालयाची स्थापना केली. गेल्या ५० वर्षापासून हे महाविद्यालय ह्या भागात विद्यार्थ्यांना सुशिक्षित व सुसंस्कारीत नागरीक बनविण्याचे कार्य अखंडपणे करीत आहे. ह्या भागात सामान्य नागरीकांनाही शिक्षणाचे महत्व पटवून देऊन चारित्र्यवान, शारिरीक सुदृढ व बुध्दिमान युवक बनविण्याचे कार्यही या महाविद्यालयाच्या अंतर्गत विविध योजना, कार्यक्रम व उपक्रमाद्वारे अव्याहतपणे सुरु आहे.

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्य दोन इमारती व ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत, मुलांचे आणि मुलींचे वसतीगृह तसेच उपहारगृह यांच्या इमारती सुमारे २५ एकर जमिनीच्या विस्तीर्ण जागेवर आवश्यक त्या सर्व सोयींनी सुसज्ज असून ह्या सर्व परिसरातील सागवान व हिरवी वनराई मोठ्या डौलाने उभी आहे. ह्या निसर्गरम्य परिसरात हु. पानसरे यांची पवित्र समाधी, हुतात्मा स्मारकाची देखणी वास्तू, महाविद्यालयाचे संस्थापक कै. जयराम अंबेकर ह्यांचे प्रेरणादायी ठरणारे स्मारक व हुतात्मा पानसरेंचा पुतळा ही चार स्मृतीस्थळे संस्थेची श्रध्दास्थाने आहेत.

**१.२) महाविद्यालयात खालील अभ्यासक्रम शिकविले जातात**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) कनिष्ठ विभाग | : | अकरावी व बारावी या उच्च माध्यमिक स्तरावरील कला, वाणिज्य व विज्ञान हे दोन वर्षे कालावधीचे अभ्यासक्रम. | |
| ब) वरिष्ठ विभाग | : | बी.ए., बी.कॉम. शाखेतील तीन वर्षे कालावधीचा पदवी अभ्यासक्रम | |
| क)पदव्युत्तर विभाग | : | एम.ए. इतिहास (विना अनुदानित) हा दोन वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम | |
| ड) पदव्युत्तर संशोधन | : | **संशोधन मार्गदर्शक** | **विषय** |
| | | १. प्राचार्य डॉ. श्रीरामे ए.एच. | वाणिज्य |
| | | २. डॉ. सय्यद ए.आर. | इंग्रजी |
| | | ३. डॉ. गायकवाड आर.जे. | राज्यशास्त्र |
| | | ४. डॉ. कांबळे एस.एल. | मराठी |
| | | ५. डॉ. भद्रे एन.जी. | इतिहास |
| | | ६. डॉ. वाकरडकर एम.आर. | शारीरिक शिक्षण |
| | | ७. डॉ. बेलखेडे एम.बी. | राज्यशास्त्र |
| | | ८. डॉ. चौधरी जी.पी. | वाणिज्य |
| | | ९. डॉ. जाधव डी.बी. | हिंदी |
| | | १०. डॉ. शिंदे पी. बी. | हिंदी |
| | | ११. डॉ. शिवशेट्टे एन.ए. | मराठी |
| ई ) संशोधन केंद्र | : | स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड इतिहास व वाणिज्य विषयात मान्यताप्राप्त संशोधन केंद्र | |

**१.३) उपक्रम :**

**अ. राष्ट्रीय सेवा योजना** (NSS)

**ब. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडचे पदव्युत्तर बहिस्थ शिक्षण अभ्यासकेंद्र : मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन**

**क. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक चे अभ्यासकेंद्र : बी.ए., बी.कॉम.**

**ड. स्पर्धा परीक्षा केंद्राची सोय आणि सुसज्ज अशी स्वतंत्र अभ्यासिका.** ई. **SWAYAM & NPTEL Local Chapter**

**१.४) पायाभूत सोयी व अध्ययन सामुग्री :**

१) ५९ हजार ग्रंथ असलेले मध्यवर्ती ग्रंथालय
२) विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयामार्फत फक्त वर्षभर क्रमिक पुस्तके मिळण्याची सोय
४) महत्त्वाची नियतकालिके व वर्तमानपत्रे उपलब्ध असलेला वाचनकक्ष
५) मुले व मुलींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था असलेली प्रशस्त व निसर्गरम्य जागेतील कँन्टीन
६) व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची सोय
७) विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी वसतीगृहाची सुविधा
८) भव्य विस्तीर्ण क्रीडांगण
९) अनुभवी शिक्षकवृंद
१०) विद्यार्थीनी कक्ष
११) २५ एकरचा निसर्गरम्य परिसर

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## परिशिष्ट - अ

अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रमात (रा.से.यो. व क्रीडा क्षेत्रात) सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी अंतिम परिक्षेत पाच अतिरिक्त गुण देण्याबद्दल नियमावली.

१. पाच(५) अतिरिक्त गुण पदवी परिक्षेच्या गुण संख्येत समाविष्ट केले जातील.

२. पदवी अंतिम परिक्षेच्या एक अथवा दोन विषयात पाच पेक्षा कमी गुणाच्या अभावी अनुत्तीर्ण होणारे विद्यार्थी अतिरिक्त पाच गुण समाविष्ट केल्यानंतर जर उत्तीर्ण होत असतील तर त्याचा लाभ घेता येईल, अन्यथा वर दर्शविल्याप्रमाणे (१) एकत्रित गुणसंख्येत समाविष्ट केले जातील.

३. जर एखादा विद्यार्थी एका पेक्षा अधिक उपक्रमात सहभागी झालेला असला तरी वाढीव गुण पाच पेक्षा अधिक मिळू शकत नाहीत.

४. अतिरिक्त गुणांच्या सवलतीचा वापर गुणवत्ता वाढीसाठी करता येणार नाही.

५. अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थ्यास अतिरिक्त गुण देण्यात येतील

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## विद्यार्थी आचार व अनुशासन संहिता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ९५ अंतर्गत तयार करण्यात आलेली विद्यार्थी आचार संहिता लागू असेल.

**१. विद्यार्थ्यांनी -**

१) प्रवेश पुर्ण होताच आपले ओळखपत्र प्राप्त करून ते आपल्या जवळ नेहमी बाळगावे.

२) प्रत्येक तासाला विद्यार्थ्यांनी वर्गात उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

३) प्रत्येक विषयाची दरमहा किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे.

४) उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास

अ) सकारात्मक दंड आकारला जातो. ब) पालकांना SMS द्वारे कळविण्यात येते.

क) सततच्या गैरहजेरीबद्दल ताकिद देऊन महाविद्यालयातील सर्व सवलती रद्द केल्या जातात.

ड) सातत्याने गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द केला जातो.

इ) परीक्षेस बसण्यास अपात्र मानले जाईल व परवानगी नाकारली जाईल.

५) सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व, वादविवाद, एन.एस.एस. शिबीर, शैक्षणिक सहली अथवा अन्य कारणासाठी विद्यार्थी महाविद्यालयात अनुपस्थित राहिल्यास त्या त्या विभागाच्या प्रभारी प्राध्यापकांच्या स्वाक्षरीसह कार्यालयात वेळीच अर्ज दाखल करणे बंधनकारक आहे.

६) विद्यार्थी आजारी असल्यास आजारानंतर महाविद्यालयात येताना सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र आणून ते कार्यालयात दाखल करणे बंधनकारक आहे.

७) आजारी रजा मंजूर केली असली तरी विद्यापीठ / बोर्डाच्या नियमानुसार उपस्थिती अनिवार्य आहे.

८) संबधित शिक्षक / प्राध्यापकांच्या पूर्व परवानगी शिवाय वर्गात / प्रयोगशाळेत प्रवेश करु नये अथवा वर्गातून / प्रयोगशाळेतून बाहेर जाऊ नये.

९) संबंधित अधिकाऱ्याच्या पूर्व सहमती शिवाय वसतिगृह / महाविद्यालयात कोणत्याही व्यक्तीला निमंत्रित करु नये अथवा सोबत आणू नये.

१०) महाविद्यालय परिसरातील सर्व इमारती, क्रीडांगण, उद्यान स्वच्छ व सुंदर ठेवण्यात पूर्ण सहकार्य करावे.

११) ग्रंथालय अभ्यासिकेच्या दालनात शांतता पाळावी.

१२) वृत्तपत्रे, नियतकालिके व संशोधन पत्रिका यांचे नियमितपणे वाचन करावे आणि आपल्या ज्ञानात भर घालावी.
१३) पाठ्यपुस्तकाशिवाय संदर्भ ग्रंथ वाचण्याची आवड विकसीत करावी.
१४) ग्रंथालयातील पुस्तके, मासिके आणि नियतकालिके काळजीपूर्वक हाताळावीत. त्यांचे नुकसान केल्यास दंड आकारला जाईल.
१५) महाविद्यालयात आयोजित केलेल्या अभ्यासक्रमाशी निगडीत ज्ञानवर्धक उपक्रमात तसेच सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

**अ. खेळाडू विद्यार्थी :**

खेळाडूंनी नियमितपणे सरावासाठी मैदान/क्रीडांगणावर उपस्थित राहावे. अनियमित राहणाऱ्या व अपुरे नैपुण्य प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचा विविध / आंतर महाविद्यालयीन / आंतर विद्यापीठीय क्रिडा स्पर्धेत प्रतिनिधीत्व करण्याचा विचार केला जाणार नाही.

**ब. राष्ट्रीय सेवा योजना :**

राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविद्यालय / विद्यापीठीय अधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांना विशेषतः शिबीरांना उपस्थित रहावे व कर्तव्य भावनेने त्यात सहभागी व्हावे. राष्ट्रीय सेवांतर्गत जे प्रकल्प हाती घेण्यात येतील त्यात जाणीवपूर्वक सहभागी होऊन योगदान द्यावे.

**क. कला व सांस्कृतिक उपक्रम :**

सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संगीत, नाटक व इतर सांस्कृतिक उपक्रमांच्या सरावासाठी नियमितपणे उपस्थित राहावे. जे विद्यार्थी सरावासाठी नियमीत उपस्थित राहणार नाहीत त्यांची महाविद्यालय/विद्यापीठ युवक महोत्सव व अन्य स्पर्धांसाठी प्रतिनिधी म्हणून निवड केली जाणार नाही.

१. आपल्यामध्ये वैज्ञानिक व धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, श्रमप्रतिष्ठा व नैतिक मूल्येआत्मसात करण्याचा, तसेच लोकशाही जीवनव्यवस्था आणि राष्ट्रीय एकात्मता संबंधीच्या आदर्श तत्वांचा विकास आपल्या आचार विचारातून जाणीवपूर्वक करावा.
२. आपला सांस्कृतिक वारसा जतन करण्याचा आणि राष्ट्रीय विकासाच्या उद्दिष्टांशी त्यातील उदात्त मूल्यांचा सांधा जोडण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न करावा.

**२. विद्यार्थी आणि त्यांचे वर्तन :**

१. विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या लौकिकात भर पडेल असेच वर्तन करावे आणि त्यास पोषक ठरतील अशाच उपक्रमात सहभागी व्हावे.
२. वस्तीगृह आणि महाविद्यालय परिसरात आपल्या विनयशील वर्तणुकीने पोषक सौहार्दपुर्ण असे वातावरण निर्माण करावे.
३. विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या, अडचणी, तक्रारी इत्यादी प्रशासनासमोर सनदशीर व शांततामय मार्गानेच सादर कराव्यात.
४. वर्गातील अध्ययन – अध्यापन कार्यात व्यत्यय येईल असे कोणतेही कृत्य करु नये.
५. रिकाम्यावेळी व्हरांडयात फिरु नये व गोंगाट करु नये, या वेळात विद्यार्थ्याने ग्रंथालयातील अभ्यासिकेचा लाभ घ्यावा.
६. संबंधित अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही स्वरूपाचा कार्यक्रम सभा, स्पर्धा, सहल, वनभोजन अशा उपक्रमासाठी निधी संकलित करण्यात सहभागी होऊ नये. असे हे कृत्य अनाधिकृत, नियमबाह्य, निषेधार्थ मानले जाईल व ते दंडास पात्र राहील.
७. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय एखादी खोली, दालन, कार्यालय, वर्गकक्ष, निवासस्थाने किंवा परिसरांचा भाग वापर करण्याच्या, इतरांना करू देण्याच्या कृतीमध्ये सहभागी होवू नये.
८. वस्तीगृह आणि महाविद्यालयाच्या परिसरात शस्त्रास्त्रे, स्फोटके, रासायनिक, आम्ल पदार्थ, विष आणि विषारी पदार्थ, मादक पेये व गुंगी/नशा/झिंग आणणारे पदार्थ आणू नये/जवळ बाळगू नये/बाळगणाऱ्यांना सहकार्य करू नये.
९. महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखू, गुटखा/मद्यपान, मादकद्रव्य आणि गुंगी व नशा आणणारे पदार्थ सेवन करण्यास, पान खाण्यास, बिडी, सिगारेट ओढण्यास सक्त बंदी घालण्यात आली असून धुम्रपान करणाऱ्या विरुध्द कडक कारवाई केल्या जाईल.
१०. वसतिगृह आणि महाविद्यालयच्या परिसरात किंवा बाहेर कोणत्याही विद्यार्थ्यांविरूध्द कसल्याही स्वरूपाची रॅगिंग करण्यामध्ये सहभागी होऊ नये. हा गंभीर व अक्षम्य स्वरूपाचा गुन्हा मानला जाईल.
११. परराष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना छळणे, मानभंग करणे, तुच्छ लेखणे हे गैर आहे.
१२. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यावर आळा घालणे किंवा दुसऱ्यांचा अपमान करणे, शारीरिक छळ करणे किंवा निंदा करणे किंवा निंदा

नालस्तीपर भाषा वापरणे अशा कृत्यात सहभाग होऊ नये.

१३. वसतिगृह व महाविद्यालयच्या साधनसंपत्ती आणि मालमत्तेच्या नासधूस करण्याच्या किंवा विद्रूप करण्याच्या कृतीत सहभागी होऊ नये.

१४. महाविद्यालयाने आयोजीत केलेल्या स्पर्धेमध्ये पंचाच्या विरुध्द निंदानालस्तीपर भाषा वापरणे, टिंगल–टवाळी करणे, शारीरिक छळ किंवा विक्षिप्त शारीरिक चाळे करणे हे गैर कृत्य मानले जाईल.

१५. महाविद्यालय/वसतिगृहाच्या विद्यमाने आयोजिलेल्या क्रीडास्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमात गैर व नियम–बाह्य कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

१६. राजकीय पक्षांनी किंवा कोणत्याही संघटनांनी शासन किंवा महाविद्यालय, विद्यापीठ, इतर संघटनेविरूध्द आपला असंतोष व्यक्त करणाऱ्यांसाठी पुकारलेल्या बंदात/घेराव/रस्ता रोको/मोर्चा/निषेध सभा वगैरे मध्ये सहभागी होऊ नये.

१७. महापुरूषांचे पुतळे/देवी देवता/प्रार्थना स्थळे यांची विटंबना केल्याच्या निषेधार्थ किंवा अन्य अशा कारणामुळे प्रशुब्ध होऊन महाविद्यालयातील अध्यापन कार्य बंद पाडू नये.

१८. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय महाविद्यालयाच्या शिक्याचा/लेटरपॅडचा वृत्तपत्रांना पत्रे पाठविण्यासाठी किंवा कोणत्याही स्वरूपाचा मजकूर प्रस्तुत करण्यासाठी किंवा तो मुद्रित करून वाटण्यासाठी उपयोग करू नये.

१९. शासकीय नियमानुसार महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरास पूर्णतः बंदी आहे. (Mobile strictly prohibited in college campus) या उपरही मोबाईल आढळून आल्यास तो जप्त करुन पालकांशिवाय कोणाकडेही परत केला जाणार नाही.

२०. रॅगिंग व अन्य प्रकरणी दोषी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांवर कायदेशीर कारवाई करून दंड आकारण्यात येईल.

२१. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने महाराष्ट्र कायदा १९९४ च्या अंतर्गत तयार केलेले अधिनियम, अध्यादेश आणि नियमांचा भंग करणाऱ्याा कोणत्याही कृतीत सहभागी होऊ नये.

## सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने ठरवून दिलेला गणवेश अनिवार्य आहे.

**३. विद्यार्थी आणि परीक्षा :**

१. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परीक्षेत कसल्याही प्रकारचा अनुचित व अवैध मार्गाचा अवलंब करू नये.

२. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य द्यावे.

३. परीक्षा संबंधित खालील नोंदविलेल्या कृतिमध्ये सामील होऊ नये.

i. परीक्षा दालनात कोणत्याही प्रकारचे मुद्रित, चक्रमुद्रित, टंकलिखित, हस्तलिखित, छायांकित, झेरॉक्स, साहित्य आणू नये.

ii. परीक्षा चालू असतांना आपापसात बोलू नये/आवाज करू नये.

iii. उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका किंवा तिचा भाग दालनाबाहेर घेऊन जाऊ नये.

iv. पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, सहकेंद्रप्रमुख, प्राचार्य किंवा परीक्षेशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यांशी उध्दट व आक्षेपार्ह वर्तन करण्याच्या कृतीमध्ये सामिल होऊ नये.

v. पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, सहकेंद्रप्रमुख, प्राचार्य किंवा परीक्षेशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

vi. तोतया परीक्षार्थी परीक्षा दालनात बसविण्यासाठी प्रवेशपत्राचा (Admit Card) दुरूपयोग करू नये.

vii. परीक्षा दालनात प्रवेश करण्यापूर्वी किंवा परीक्षा चालू असताना परीक्षेशी संबंधित अधिकायाने तपासणी केली तर त्याला विरोध करू नये.

viii. परीक्षेशी संबंधित अधिकायांनी अधिकृतरीत्या नियुक्त केलेल्या चौकशी समितीसमोर हजर राहवे व साक्ष द्यावी.

ix. परीक्षेतील गैरप्रकारच्या संदर्भात विद्यापीठाने तयार केलेली शिक्षा सूची विद्यार्थ्यांना लागू राहील हे लक्षात घ्यावे.

**४. विद्यार्थी आणि प्राध्यापक :**

१. प्राध्यापकांचा आणि संबंधित अधिकायांचा आदरं करावा आणि एकंदर अध्यापन व्यवसायाचाच मान राखावा.

२. महाविद्यालय परिसररात व बाहेर प्राध्यापक आणि संबंधित अधिकाऱ्यांविषयी बोलताना/चर्चा करताना आदरपूर्वक उल्लेख करावा

३. वर्गबंधू आणि भगिनींनी या संदर्भात प्राध्यपकासमोर आणि विशेषत प्रशासनासमोर बेछूट आरोप किंवा निंदानालस्ती करू नये

४. शिक्षकेत्तर कर्मचायांशी प्राध्यापकाप्रमाणेच आदराने वागावे व त्यांच्याशी नम्रतापूर्वक बोलावे
५. महाविद्यालतील एखाद्या विद्यार्थ्या विषयी अश्लील, गलिच्छ, अपमानीत व चारित्र्यहनन करणारा मजकूर फळयावर,भिंतीवर किंवा परिसरात कुठेही लिहू नये.
६. मुलींचा विनयभंग हा अक्षम्य स्वरुपाचा गुन्हा मानला जाईल.

**५. विद्यार्थी आणि समाज :**

१. सामाजिक आरोग्याच्या व प्रगतीच्या दृष्टीने प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे सामाजिक प्रश्न समजून घ्यावे आणि विविध स्वरुपाच्या सामाजिक उपक्रमांत सहभागी व्हावे.
२. प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली निरक्षरता, व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, पर्यावरण, वृक्षारोपण यासारख्या उपक्रमासाठी आवश्यक सहकार्य करावे तसेच इतर मान्यताप्राप्त अभियानात आपल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली योगदान द्यावे आणि स्वतःचा व समाजाचा नैतिक व बौद्धिक विकास करावा.
३. समाजातील ज्येष्ठ व वडिलधाया व्यक्तिंचा आणि विशेषत्वाने महिला वर्गाचा आदर राखावा
४. विविध समाजघटक, धार्मिक किंवा भाषिक समूहांमध्ये व्देषभाव किंवा शत्रूत्व निर्माण होवू शकेल अशा कोणत्याही कृत्यामध्ये सामील होवू नये. या उलट आपल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समाज घटकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्याच्या कामी क्रियाशील राहवे.

**६. विद्यार्थी आणि पालक :**

१. विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगतीची व प्रश्नांची माहिति आपल्या पालकांना वेळोवळी कळवावी.
२. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊ नये.
३. पालकांनी महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगती विषयी माहिती मिळवावी. आपल्या पाल्यांच्या प्रगतीकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**७. दंड, किंवा दंडात्मक कार्यवाही :**

विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वर्तम आणि शिस्तीच्या अटी व नियमाचे उल्लंघन झाल्यास कोणताही विद्यार्थी त्याच्या गैरवर्तनासाठी किंवा नियमबाह्य कृतीसाठी खाली निर्देशित केलेल्या एक किंवा अनेक दंडात्मक कार्यवाही अंतर्गत शिक्षा भोगण्यास पात्र राहील

१. विद्यार्थ्यांकडून कुठल्याही गैरकृत्यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सक्त ताकीद देणे.
२. प्रवेश रद्द करणे. ३. प्रवेश रद्द करून पुढील प्रवेशास प्रतिबंध करणे.
४. शैक्षणिक सत्र रद्द करणे. ५. विद्यापीठ परीक्षेचे आवेदनेयत्र रोखून धरणे किंवा रद्द करणे
६. महाविद्यालय, संस्थेचे वसतिगृह किंवा निवास कक्षांतून निश्चित कालावधीसाठी काढून टाकणे. मात्र हा कालावधी पाच वर्षपेक्षा अधिक असणार नाही.
७. फी किंवा अनामत रक्कम परत न करणे.
८. जीमखाना, ग्रंथालय आणि इतर सवलतीचा विशिष्ट कालावधीसाठी लाभ घेण्यास मज्ञाव करणे.
९. नादारी, शिष्यवृती, इतर सवलती आणि आर्थिक मदतीचे फायदे रद्द करणे.
१०. विद्यापीठाअंतर्गत चालणाऱ्या महाविद्यालय किंवा संस्थेच्या आणि विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेला बसण्यासाठी विशिष्ट कालावधीकरीता मज्ञाव करणे, मात्र हा कालावधी पाच वर्षापेक्षा अधिक नसेल...
११. गैरप्रकाराचे स्वरुप लक्षात घेऊन कोणतीही कार्यवाही करणे.

**८. संहिता दुरुस्ती :** विद्यार्थी आचार व अनुशासन संहितेस महाविद्यालय व विद्यापीठ आवश्यकतेनुसार बदल/दुरुस्ती करील.

**९. रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम - २००९**

रॅगिंग करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. रॅगिंगच्या वाढत्या घटनांमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने २००९ मध्ये रॅगिंग करणाऱ्याला कठोर शिक्षेची तरतूद असलेला अधिनियम प्रसारीत केला आहे. रॅगिंग संदर्भात या विद्यापीठात रॅगिंग प्रतिबंधक समिती स्थापन करण्यात आली असून या अधिनियमाची कठोर अंमलबजावणी विद्यापीठात केली जाणार आहे. रॅगिंग ही दुसऱ्या विद्यार्थ्याला शारिरीक किंवा मानसिक क्लेष होईल असे वर्णन करण्याचा एक अत्यंत घृणास्पत अमानवी विकृत प्रकार आहे. रॅगिंगमुळे निष्पाप विद्यार्थ्याचे खच्चीकरण तर होतेच परंतु रॅगिंगमुळे प्रसंगी एखादा विद्यार्थी प्राणासही मुकू शकतो. रॅगिंगमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव होतो.

- ※ नव प्रवेशित विद्यार्थ्यांना बोलून, लिहून, चिडवून, उध्दटपणे वागून त्याला / तिला मानसिक किंवा शारिरीक इजा पोहचविणे
- ※ इतरांची मानहानी करणारे, लज्जा उत्पन्न करणारे वर्तन करणे
- ※ नव प्रवेशित विद्यार्थ्यावर वरिष्ठत्वाच्या नात्याने जोर जुलुम करणे
- ※ दहशत उत्पन्न करणे, सत्ता प्रस्थापित करणे, त्यांना शिक्षा देणे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे इतर विद्यार्थ्यांना त्रास देणारी कोणतीही कृती करणे.

**९.१ रॅगिंग करणाऱ्यास शिक्षा :**

या अधिनियमात रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षेची तरतूद आहे. दोषी विद्यार्थ्यांला खालीलपैकी एक अथवा अधिक शिक्षेस सामोरे जावे लागेल.

- ※ वर्गात बसणे व इतर शैक्षणिक लाभापासून वंचित करणे.
- ※ शिष्यवृत्ती फेलोशिप यापासून वंचित करणे.
- ※ परीक्षेसाठी अपात्र ठरविणे.
- ※ निकाल राखून ठेवणे.
- ※ कोणत्याही युवक महोत्सव, टूर्नामेन्टमध्ये सहभागास प्रतिबंध करणे.
- ※ एक ते चार सत्रापर्यंत निलंबित करणे.
- ※ शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करणे, तसेच इतर कोणत्याही संस्थेत काही काळासाठी प्रवेशपासून वंचित करणे.
- ※ आणीबाणीच्या प्रसंगी विद्यार्थी / विद्यार्थीनींनी रॅगिंग प्रतिबंधक समितीकडे संपर्क साधावा.

**१०. महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया :**

१. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर १५ दिवसाच्या आत प्रवेश घेता येतो.

२. प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या मुळप्रती व प्रत्येकी तीन सत्यप्रती जोडाव्या लागतील.

- ※ शाळा व महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Transfer Certificate)
- ※ गुणपत्रिका (Marks Memo)
- ※ स्वा.रा.ती.म. विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)
- ※ पासपोर्ट आकाराचे चार फोटो.
- ※ **आधारकार्ड (सत्यप्रत)**
- ※ आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी ई.बी.सी. फॉर्म, उत्पन्नाचा दाखला व कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र, आई / वडील ह्यात नसतील तर भाऊ / पाल्यांच्या नवीन ई.बी.सी., उत्पन्नाचा फॉर्म, आई / वडील नसल्याचे प्रमाणपत्र.
- ※ ११ वी व १२ वी च्या विद्यार्थीनीसाठी मोफत शिक्षणाची सोय असल्यामुळे वडिलांच्या नावाने प्रतिज्ञापत्र व कुटूंब मर्यादा प्रमाणपत्राच्या दोन प्रती.
- ※ मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीच्या प्रमाणपत्राच्या दोन सत्यप्रती.
- ※ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्मसोबत टी.सी. व गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांसह मुदतीत अर्ज दाखल करावेत.
- ※ ई.बी.सी. / पी.टी.सी. / गर्ल्स फ्री शिप व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडल्यास १०० रू. बाँड पेपरवर गॅप सर्टिफिकेट, सक्षम अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या दोन सत्यप्रती.

३. सर्व वर्गातील प्रवेश गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील.

४. **पदवी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी प्रवेश प्राप्त होताच ABC-ID (Academic Bank of Credit) ची नोंद करणे अनिवार्य आहे.**

४. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी निकाल घोषित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत नोंदणी शुल्क २० रू. भरून शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रतीसह नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

५. नाव नोंदणीची मुदत संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत वर्गनिहाय प्रवेश क्षमतेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

६. शासन नियमानुसार ५२ % जागा राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी.

७. ४८ % जागा खुल्या प्रवर्गातून भरतांना सर्व संवर्गातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा समावेश त्यात राहील.
८. खुल्या प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्यास शासन / विद्यापीठ नियमानुसार ह.गो.पा.शि.प्र. मंडळाच्या संचालक कोट्यातुन भरण्यात येतील.
९. खुल्या व राखीव संवर्गातील उपलब्ध जागापैकी ३० % जागा विद्यार्थीनीसाठी आरक्षित आहेत.
१०. एम.ए. इतिहास विषयातील प्रथम व व्दितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस पूर्ण फीस भरावी लागेल.
११. शिष्यवृत्तीधारक (GOI) विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती नामंजूर झाल्यास पूर्ण फीस भरावी लागेल.
१२. शासनाकडून वेतनेत्तर अनुदान न मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थ्यांस अधिकची फीस आकारली जाईल.
१३. प्रयोगशाळा शुल्क फक्त विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना भरावे लागेल.
१४. बारावी वर्गात प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांना पूर्ण प्रवेश शुल्क भरावे लागेल.

**१०.१ ग्रंथालय विभाग :**

**ग्रंथालयाचे सर्वसाधारण नियम व अटी**

१. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क रू. २५/- भरून नवीन ओळख पत्र घ्यावे लागेल.
२. ग्रंथालयात प्रवेश करतांना विद्यार्थ्यासोबत ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.
३. विद्यार्थ्याने ग्रंथालय व वाचन कक्षात गणवेशात असणे आवश्यक आहे.
४. डुप्लिकेट ओळखपत्रासाठी रु. १५/- इतके शुल्क आकारण्यात येईल.
५. ग्रंथालयातून ग्रंथ घेतांना त्याची पाने तपासून घ्यावीत.
६. ग्रंथ हरवल्यास अथवा खराब केल्यास नवीन ग्रंथ उपलब्ध करून द्यावा लागेल अन्यथा अद्ययावत किंमतीच्या दुप्पट रक्कम वसूल केली जाईल.
७. अभ्यासिकेतून ओळखपत्रावर घेतलेली पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व इतर वाचनसाहित्य बाहेर जातांना परत करावीत अन्यथा दररोज १०/- रू. प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
८. दिवाळीच्या सुट्टीत नेहमीप्रमाणे देवघेव विभाग चालू राहील. संपूर्ण दिवाळी - उन्हाळी सुट्टीसाठी पुस्तके मिळणार नाहीत.
९. ग्रंथालयातील कर्मचारी किंवा संबधिताशी असभ्य वर्तन करणे व शिस्त न पाळल्यास विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन सवलती बंद केल्या जातील व दंड आकारण्यात येईल.
१०. ग्रंथालयासंदर्भात विद्यार्थ्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या लेखी स्वरूपात वाचन कक्षातील सूचना पेटीत टाकाव्यात अथवा ग्रंथपालाशी त्वरीत संपर्क साधावा.

**१०.२ ग्रंथालय विभाग :**

१. ग्रंथालयाच्या देवघेव विभागातून विद्यार्थ्यांना / क्रमिक पाठ्यपुस्तके, कथा, कादंबऱ्या, कविता संग्रह व इतर ग्रंथ फक्त सात दिवसाकरीता दिले जातील.
२. विद्यार्थ्यांना ओळखपत्रावर सात दिवसासाठी फक्त दोनच पुस्तके दिले जातील.
३. संदर्भ ग्रंथ व दुर्मिळ ग्रंथ घरी दिले जाणार नाहीत मात्र ते वाचनकक्षात ओळख पत्रावर घेऊन वाचता येतील.
४. देवघेव विभाग सकाळी १०.०० ते दुपारी १.३० व दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत चालू राहील.
५. वाचन स्पर्धा, लेखन स्पर्धा व अन्य महत्त्वपूर्ण शैक्षणिक कामासाठी नियमित ग्रंथाशिवाय संबंधित विभागाच्या शिफारशीनुसार अतिरीक्त एक ग्रंथ दिला जाईल.
६. वाचन कक्षात पाठ्यपुस्तकाशिवाय स्पर्धात्मक परीक्षेची पुस्तके दैनिके, नियतकालिके व प्रश्नपत्रिका संच इत्यादी वाचन साहित्य ओळखपत्र ठेऊन मिळेल.
७. विद्यार्थ्यांनी वाचन कक्षात शांतता पाळावी इतरांना त्रास होईल असे वर्तन करू नये. ग्रंथालय नियमांचे उल्लंघन करू नये.

**१०.३ विद्यार्थी वसतिगृह प्रवेश :**

पानसरे महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी वसतिगृह चालवले जाते. इच्छुक विद्यार्थी-विद्यार्थीनींना त्यांच्या गुणवत्तेनुसार ठराविक शुल्क भरल्यानंतर प्रवेश मिळू शकतो. वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी लागणारे अर्ज कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक तपशीलासाठी प्रा. डॉ. मदनुरे व्ही.के. यांच्याशी संपर्क साधावा.

## 11 भारत सरकार शिष्यवृत्ती योजना

भारतीय घटनेनुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी भारत सरकारतर्फे देण्यात येणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येते. त्याची माहिती व नियम खालीलप्रमाणे आहेत.

**आवश्यक पात्रता**

११.१ जून २०१५–१६ पासून ई–शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली असून विद्यार्थ्यांनी ३० जुलै पर्यंत शिष्यवृत्तीचा फॉर्म भरणे आवश्यक आहे.बँकेतील खाते उघडून आपला खातेक्रमांक शिष्यवृत्ती अर्जावर नोंदवणे आवश्यक आहे.

११.२ विद्यार्थ्यांची जात शासनाने मान्य केलेल्या मागासवर्गीय यादीमध्ये (अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती .आणि इतर मागासवर्ग) समाविष्ट असावयास हवी. पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी बौध्द धर्म स्वीकारला असेल तरीही त्यांना शिष्यवृत्तीस पात्र समजण्यात येईल.

११.३ अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. २,००,०००/– पेक्षा कमी असावे. तसेच विमुक्त भटक्या, निम भटक्या, इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. २,००,०००/– पेक्षा कमी असावे. सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपल्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला तहसिलदारांचाच देणे आवश्यक आहे.

११.४ शासनाने किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विद्यार्थ्यांनी वेळचे वेळी उत्तीर्ण व्हावयास पाहिजे. परीक्षा अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. तीन किंवा अधिक वर्षापेक्षा जास्त शैक्षणिक खंड असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही

११.५ कला, वाणिज्य पदवी पूर्ण करून किंवा नापास होऊन एखादा विद्यार्थी जर व्यावसायिक पदवी / पदविका प्रमाणपत्र शिक्षण घेत असेल तर त्यालाही शिष्यवृत्ती मिळू शकेल मात्र अशा विद्यार्थ्यांना त्याच्या अभ्यासक्रमामध्ये बदल करता येणार नाही. जे विद्यार्थी बी.एड. अथवा बी.पी.एड. परीक्षा पास होऊन महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात त्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही.

११.६ विद्यार्थी पूर्णकालीन नोकरी करत असल्यास शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही. परंतु विनावेतन रजा घेऊन शिकणारा विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र ठरेल.

११.७ एकाच कुटूंबातील दोनपेक्षा अधिक मुलांनाही (मुलगा किंवा मुलगी) नवीन शासन नियमानुसार शिष्यवृत्ती देण्यात येईल.

११.८ विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती किमान ७५ टक्के असल्याशिवाय शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार नाही.

## 12 शिष्यवृत्ती बाबत नियमावली

१२.१ शिष्यवृत्ती करिता पात्र असलेल्या विद्यार्थ्याने सर्वप्रथम त्या शिष्यवृत्तीकरिता आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे शिष्यवृत्तीधारक पत्रासोबत शिष्यवृत्ती विभागातील लिपीकाकडे देऊन त्यांची पावती घ्यावी. सर्व कागदपत्रे एकाचवेळी दाखल करणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीधारक म्हणून प्रवेश दिला जाणार नाही.

१२.२ अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती या संवर्गातील विद्यार्थ्यांनी आपली जात व नागरिकत्व या संबंधीचे प्रमाणपत्र खालील अधिकाऱ्यांची सही घेऊन पाठवावे. संसद सदस्य / जिल्हा परिषद सदस्य / राजपत्रित अधिकारी किंवा अर्जदार जेथे प्रत्यक्ष राहत असेल त्या राज्य शासनाने / संघराज्य क्षेत्र शासनाने विशेषरित्या प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची सही असली पाहिजे. हे प्रमाणपत्र नुतनीकरण आवेदन पत्रासोबत देण्याची आवश्यकता नाही. स्थलांतरीत विद्यार्थी (दुसऱ्या महाविद्यालयातून येणारा) असल्यास त्याने पुर्वीच्या शिष्यवृत्ती मंजूर क्रमांक आणि टी.सी.ची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

१२.३ प्रवेश अर्जासोबत प्रथमच प्रवेश घेत असेल तर त्याने नवीन शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरावे. जर विद्यार्थी गतवर्षी मार्च / एप्रिल मध्ये होणाऱ्या परीक्षेस उत्तीर्ण होऊन दुसऱ्या अगर तिसऱ्या वर्षात प्रवेश घेत असेल तर त्याने नुतनीकरण आवेदन पत्र भरावे. त्याचे फार्म वेगळे असतात. शिष्यवृत्ती आवेदनपत्र, महाविद्यालयाने निर्धारीत केलेल्या मुदतीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर शिष्यवृत्ती आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही व त्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर झाली नाही तर त्याची जबाबदारी त्या विद्यार्थ्यावर राहील.

१२.४ महाविद्यालयीन शैक्षणिक शिक्षणामध्ये खंड पडला असल्यास अर्जासोबत विद्यार्थ्याने संबंधित काळामध्ये शिष्यवृत्ती मिळाली किंवा नाही ते दर्शविल असे प्रतिज्ञापत्रक (ऑफिडिव्हेट) जोडावे. खंड पडलेल्या काळातील शिष्यवृत्ती मिळणार नाही.

१२.५ नवीन शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरणाऱ्या विद्यार्थ्याने आपला स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो आवेदन पत्रास जोडून सुचीपत्रावर लावावा.

१२.६ विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीपत्रामध्ये मागितलेली माहिती बिनचूक भरावी. वडील असल्यास नातेवाईकांची अर्जावर पालक म्हणून स्वाक्षरी घेऊ नये.वडील खाजगी अथवा सरकारी नौकरी करीत असल्यास त्यांचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला (पगार, महागाई भत्ता इत्यादीसह) संबंधित अधिकृत व्यक्तीच्या सहीनिशी जोडावा.

१२.७ शिष्यवृत्ती मंजुरीसाठी आवेदन पत्रासोबत लागणाऱ्या सर्व आवश्यक त्या कागदपत्रांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१. टी.सी.ची सत्यप्रत. २. गुणपत्रिकेची सत्यप्रत ३. जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत
४. उत्पन्नाचा दाखला (तहसील कार्यालयाचा) ५. आधारकार्ड (सत्यप्रत)
६. शिष्यवृत्ती मंजुरीचा आदेश क्रमांक ७. जिल्हा बदली प्रमाणपत्र (बदली झाली असल्यास)
८. स्वीकृती प्रमाणपत्र ९. रेसिडेन्स प्रमाणपत्र १०. पासपोर्ट साईजचे चार फोटो.
११. वडील हयात नसल्यास मृत्यु प्रमाणपत्र. १२. खंड असल्यास प्रतिज्ञापत्र (गॅप सटर्फिकेट)

## 13 ई.बी.सी.सवलत

आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनातर्फे ई.बी.सी. ची सवलत दिली जाते. ई.बी.सी. सवलतीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काचा परतावा मिळावा (शुल्क माफ होते) यासाठी विद्यार्थ्यांनी खालील नियमांचा अभ्यास करून कागदपत्रांची पूर्तता करावी.

१३.१ पालकांचे मागील आर्थिक वर्षातील उत्पन्न रु. ५,००,०००/- पेक्षा कमी असावे. त्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी तहसिलदारांच्या स्वाक्षरीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र आणावे. तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांनी विशेष कार्यकारी दंडाधिकारी , अथवा तहसिलदार यांच्या स्वाक्षरीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र आणावे.

१३.२ सदरील सवलतीसाठी विद्यार्थ्यानी विहीत नमुन्यातील छापील फॉर्म वापरावेत. फॉर्म महाविद्यालयात उपलब्ध होतील.

१३.३ बँकेच्या खाते क्रमांकाची छायांकित दोन प्रती. ५.४ आधार कार्ड छायांकित दोन प्रती. ५.५ रहीवाशी प्रमाणपत्र दोन प्रती.

## 14 पारितोषिके

१. प्रा.डॉ. बेलेखेडे एम.बी. यांच्या तर्फे पदवी कला शाखेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस १००१ रुपयाचे रोख पारितोषिक.
२. कालवश गुणाबाई पुंडलीकराव वाघमारे स्मृती पुरस्कार : सिध्दार्थ वाघमारे यांच्या तर्फे बी.ए. तृतीय वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ५०१ रुपयाचे रोख पारितोषिक.
३. भन्ते नागसेन स्मृती पुरस्कार : प्रा. डॉ. सिध्दोधन कांबळे यांच्यातर्फे मराठी विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १००१ रुपयाचे रोख पारितोषिक.
४. कै. डॉ. हेडगेवार स्मृती पुरस्कार : प्रा. जयप्रकाश कमटलवार यांच्यातर्फे वाणिज्य संघटन विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ५०१ रुपयाचे रोख पारितोषिक.
५. कै. लक्ष्मणराव शिंदे स्मृती पुरस्कार : प्रा. डॉ. प्रकाश शिंदे यांच्यातर्फे हिंदी विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास ११११ रुपयाचे रोख पारितोषिक.
६. स्मृतिशेष जयंतराव गायकवाड स्मृती पुरस्कार : प्रा. डॉ. आर.जे. गायकवाड यांच्यातर्फे राज्यशास्त्र विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १००१ रुपयाचे रोख पारितोषिक.
७. कै. हणमंतराव लालप्पा मरकले स्मृती पुरस्कार : प्रा. मरकले एस.एच. यांच्यातर्फे लोकप्रशासन विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १००१ रुपयाचे रोख पारितोषिक.
८. कै. प्राचार्य मेहेत्रे एम.जी. स्मृती पुरस्कार : प्रा. गोजे आर.सी. यांच्यातर्फे पदवी वाणिज्य शाखेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १००१ रुपयाचे रोख पारितोषिक.
९. स्मृतिशेष गंगाराम भुजंगराव भद्रे स्मृती पुरस्कार : प्रा. डॉ. भद्रे एन.जी. यांच्यातर्फे एम.ए. इतिहास विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास १००१ रुपयाचे रोख पारितोषिक.

पानसरे महाविद्यालय
अर्जापूर

## शुल्क विवरण

स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पी.जी./शै. शु./परिपत्रक/२०२२-२३/४७८९ दि.२५.०५.२०२३ प्रमाणे पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी आकारण्यात आलेल्या शुल्काचे विवरण पुढील प्रमाणे

### कला शाखा (B.A. & M.A.)

| अ.क्र. | विवरण | प्रथम वर्ष | | द्वितीय वर्ष | | तृतीय वर्ष | | पदव्युत्तर इतिहास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्ण शुल्क | ईबीसी शुल्क | पूर्ण शुल्क | ईबीसी शुल्क | पूर्ण शुल्क | ईबीसी शुल्क | |
| १. | नोंदणी शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० | ३० |
| २. | प्रवेश शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| ३. | शैक्षणिक शुल्क | ११०० | ०० | ११०० | ०० | ११०० | ०० | ४००० |
| ४. | आवेदन व पात्रता शुल्क | ११० | ११० | ०० | ०० | ०० | ०० | ११० |
| ५. | ग्रंथालय अनामत ठेव | १०० | १०० | ०० | ०० | ०० | ०० | १०० |
| ६. | विद्यार्थी सहाय्यक शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ७. | जिमखाना व खेळ शुल्क | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| ८. | ग्रंथालय शुल्क | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ९. | युवास्पंदन (स्नेहसंमेलन) | ७० | ७० | ७० | ७० | ७० | ७० | ७० |
| १०. | वार्षिक अंक शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| ११. | विद्यार्थी कल्याण शुल्क | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| १२. | महाविद्यालय विकास शुल्क | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| १३. | ओळख पत्र शुल्क | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| १४. | विद्यार्थी संसद शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० | २० |
| १५. | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३५ |
| १६. | वैद्यकिय तपासणी शुल्क | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ |
| १७. | विद्यापीठ क्रीडा शुल्क | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| १८. | किरकोळ शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| १९. | टिसी फीस | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २०. | पुस्तकपेढी | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| २१. | युवक महोत्सव शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २२. | अश्वमेघ शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| २३. | अपत्कालीन निधी | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| २४. | विद्यार्थी विमा शुल्क | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ |
| २५. | मा. राज्यपालाचे कार्यालयीन उपक्रम | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| २६. | क्षेत्रिय क्रीडा परिषद शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २७. | एन.एस.एस.युनिट शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| २८. | प्रयोगशाळा शुल्क | - | - | - | - | - | - | - |
| २९. | प्रकल्प शुल्क | - | - | - | - | ६० | ६० | ६० |
| ३०. | इतर शुल्क | - | - | - | - | - | - | - |

नोट : १. ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना फिस जास्तीत जास्त दोन हप्त्यात भरणे बंधनकारक आहे.

२. विद्यापीठाने वेळोवेळी शुल्कामध्ये बदल केल्यास त्याप्रमाणे शुल्क विद्यार्थ्यास भरणे अनिवार्य आहे.

३. पदव्युत्तर वर्गास ई.बी.सी. सवलत नसल्यामुळे पूर्ण फी भरावी लागेल.

# शुल्क विवरण

स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पी.जी./शै. शु./परिपत्रक/२०२२-२३/४७८९ दि.२५.०५.२०२३ प्रमाणे पदवी व शिक्षणासाठी आकारण्यात आलेल्या शुल्काचे विवरण पुढील प्रमाणे

## वाणिज्य शाखा (B.Com.)

| अ.क्र. | विवरण | प्रथम वर्ष | | द्वितीय वर्ष | | तृतीय वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्ण शुल्क | ईबीसी शुल्क | पूर्ण शुल्क | ईबीसी शुल्क | पूर्ण शुल्क | ईबीसी शुल्क |
| १. | नोंदणी शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० |
| २. | प्रवेश शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| ३. | शैक्षणिक शुल्क | ११०० | ०० | ११०० | ०० | ११०० | ०० |
| ४. | आवेदन व पात्रता शुल्क | ११० | ११० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५. | ग्रंथालय अनामत ठेव | १०० | १०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ६. | विद्यार्थी सहाय्यक शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ७. | जिमखाना व खेळ शुल्क | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| ८. | ग्रंथालय शुल्क | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ९. | युवास्पंदन (स्नेहसंमेलन) | ७० | ७० | ७० | ७० | ७० | ७० |
| १०. | वार्षिक अंक शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| ११. | विद्यार्थी कल्याण शुल्क | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| १२. | महाविद्यालय विकास शुल्क | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| १३. | ओळख पत्र शुल्क | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| १४. | विद्यार्थी संसद शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० |
| १५. | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३५ | ३५ |
| १६. | वैद्यकिय तपासणी शुल्क | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ |
| १७. | विद्यापीठ क्रीडा शुल्क | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ | ७५ |
| १८. | किरकोळ शुल्क | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| १९. | टिसी फीस | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २०. | पुस्तकपेढी | १० | १० | १० | १० | १० | १० |
| २१. | युवक महोत्सव शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २२. | अश्वमेघ शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| २३. | अपत्कालीन निधी | १५ | १५ | १५ | १५ | १५ | १५ |
| २४. | विद्यार्थी विमा शुल्क | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ | ०८ |
| २५. | मा. राज्यपालाचे कार्यालयीन उपक्रम | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| २६. | क्षेत्रिय क्रिडा परिषद शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २७. | एन.एस.एस.युनिट शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० |
| २८. | प्रयोगशाळा शुल्क | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| २९. | प्रकल्प शुल्क | - | - | - | - | ६० | ६० |
| ३०. | इतर शुल्क | - | - | - | - | - | - |

नोट : १. ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना फिस जास्तीत जास्त दोन हप्त्यात भरणे बंधनकारक आहे.
२. विद्यापीठाने वेळोवेळी शुल्कामध्ये बदल केल्यास त्याप्रमाणे शुल्क विद्यार्थ्यास भरणे अनिवार्य आहे.

# शुल्क आकारणी

## (कनिष्ठ महाविद्यालय)

| अ.क्र. | शुल्काचे स्वरूप | शुल्क दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ११ वी | | १२ वी | |
| | | कला/ वाणिज्य | विज्ञान | कला/ वाणिज्य | विज्ञान |
| १. | प्रवेश शुल्क | १६ | १६ | १८ | १८ |
| २. | शिक्षण शुल्क | १९२ | १९२ | २१६ | २१६ |
| ३. | सत्र फी | ३२ | ३२ | ३६ | ३६ |
| ४. | नोंदणी शुल्क | १० | १० | १० | १० |
| ५. | प्रयोगशाळा शुल्क | --- | १०० | --- | १०० |
| ६. | विद्यार्थी समुह विमा | १० | १० | १० | १० |
| ७. | सराव व अंतर्गत परीक्षा | १०० | १०० | १०० | १०० |
| ८. | विद्यार्थी कल्याण शुल्क | ३० | ३० | ३० | ३० |
| ९. | सामाजिक व सांस्कृतिक कार्य | २० | २० | २० | २० |
| १०. | जीमखाना फीस | ५० | ५० | ५० | ५० |
| ११. | इतर | --- | --- | --- | --- |

नोट :

१. ई.बी.सी. व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांस अ.क्र.१ ते ३ पर्यंत फीस लागणार नाही.

२. बोर्ड बदल असल्यास रू. ७५/- योग्यता प्रमाण पत्राचे शुल्क लागेल.

३. बोर्ड परीक्षा व इतर फीस बोर्डाच्या नियमानुसार राहील.

# अभ्यासक्रमाची रूपरेषा

## बी.ए., बी.कॉम. (कला व वाणिज्यशाखा)

### बी.ए. (कला) शाखा

**प्रवेश पात्रता :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व डॉ. बा.आ.मराठवाडा विद्यापीठ परिपत्रक एसी/एनपी/५८/१९९१-९२ अन्वये बी.ए.(कला) प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी पुढीलपैकी अर्हताप्राप्त करणार असावा. (०.४६९ अन्वये)

१) पी.यु.सी/पी.डी. किंवा उच्च माध्यमिक परीक्षा मान्यताप्राप्त समकक्ष उत्तीर्ण असावा.
२) त्याने इंग्रजी विषयासह शिक्षणशास्त्र पदविका (डी.एड.) उत्तीर्ण केलेली असावी.
३) महाराष्ट्र शासनाच्या तांत्रिक शिक्षण मंडळाच्या ३ वर्षाचा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.
४) महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त औषधशास्त्र पदविका (डी.फॉर्म) उत्तीर्ण.
५) तांत्रिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेली इंग्रजी विषयासह इ.१२ वी ची किमान कौशल्यावर आधारित MCVC उत्तीर्ण असावा.

**विषय :**

१) अनिवार्य भाषा : इंग्रजी
२) व्दितीय भाषा : मराठी/हिंदी
३) ऐच्छिक विषय : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पत्र क्र. शैक्षणिक-१/परिपत्रक /विषयगट/२०२०-२०२१/२४८० दि.२४.०२.२०२१ परिपत्रकानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून ठरवून दिलेल्या ऐच्छिक विषय गटापैकी कोणतेही **तीन विषय निवडावेत (एका गटातून एकच)**

**अ गट : मराठी/अर्थशास्त्र**
**ब गट : इंग्रजी/लोकप्रशासन/शारीरिक शिक्षण (Physical Education)**
**क गट : हिंदी/राज्यशास्त्र**
**ड गट : इतिहास**

नोट : १) वरिल पैकी ३ ऐच्छिक विषय निवडावेत, कोणत्याही विषयास एकूण संख्येच्या ५0% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.
२) शारीरिक व्यंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण हा विषय घेता येणार नाही.

## वाणिज्य शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम) :

प्रवेश पात्रता : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आ.मराठवाडा विद्यापीठ परिपत्रक एसएडी/एनपी/५८/१९९१-९२ अन्वये वाणिज्य प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी पुढीलपैकी अर्हताप्राप्त करणार असावा. (०.४६९ अन्वये)

१) पी.यु.सी/पी.डी. किंवा उच्च माध्यमिक परीक्षा मान्यताप्राप्त समकक्ष उत्तीर्ण असावा.
२) त्याने इंग्रजी विषयासह शिक्षणशास्त्र पदविका (डी.एड.) उत्तीर्ण केलेली असावी.
३) महाराष्ट्र शासनाच्या तांत्रिक शिक्षण मंडळाचा ३ वर्षाचा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.
४) महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त औषधशास्त्र पदविका (डी.फॉर्म) उत्तीर्ण.
५) तांत्रिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेली इंग्रजी विषयासह इ.१२ वी ची किमान कौशल्यावर आधारित MCVC उत्तीर्ण असावा.

**2019-2020 (Semester Pattern)**

| प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | |
|---|---|---|
| **B.Com. F.Y.Semester I & II** | **B.Com. S.Y.Semester III** | **B.Com. S.Y.Semester IV** |
| **Ability Enhancement Compulsory Course (ACE)**<br>English Communication Soft Skill-I & II<br>S.L. : Marathi/Hindi -I & II<br>**Core Course**<br>Financial Accounting -I & II<br>Fundamental of Statistical & Maths-I & II<br>Business Communication -I & II<br>Business Economics -I & II<br>**Discipline Specific Elective Paper (DSE) (Any One)**<br>Computer for Business & Tally -I & II<br>Entrepreneurship -I & II<br>Salesmanship -I & II<br>Office Management -I & II | **Ability Enhancement Compulsory Course (ACE)**<br>English Communication Soft Skill-I<br>S.L. : Marathi/Hindi -I<br>**Core Course**<br>Corporate Accounting<br>Cost Accounting<br>Principles of Business Mgt. & Practice<br>Merchantile Law<br>Fundamentals of Income Tax - I<br>**Skill Enhancement Course (SEC) : 2 Credit (Any One)**<br>A - I - Business Ethics<br>A - II - E-Business Marketing<br>A - III - Business Environment<br>A - IV - E-Commerce | **Ability Enhancement Compulsory Course (ACE)**<br>English Communication Soft Skill-II<br>S.L. : Marathi/Hindi -II<br>**Core Course**<br>Advanced Corporate Accounting<br>Advanced Cost Accounting<br>Business Management<br>Corporate law<br>Income Tax Law & Practice<br>**Skill Enhancement Course (SEC) : 2 Credit (Any One)**<br>B - I - Retail Business Accounting<br>B - II - E-Cyber Crimes & Laws in Business<br>B - III - E-Insurance<br>B - IV - E-Governance |

| तृतीय वर्ष | |
|---|---|
| **B.Com. T.Y. Semester V** | **B.Com. T.Y. Semester VI** |
| Environment Studies : (Compulsory)<br>Advance Accounting : Paper - I<br>Management Accounting: Paper - I<br>Auditing : Paper - I<br>**Group A-Taxation** : Income Tax Law & Practices, Traning & Field Work<br>**Group B Managemnt** : Human Resources Management, Traning & Field Work<br>**Group C UGC Vocational Courses (TPP) : NA**<br>**Group D UGC Vocational Courses (FTPP) : NA**<br>**Group E UGC Vocational Courses Comp. App. : NA**<br>**Generic Elective** (Opt Any One) : Indian Economy - I, Labour Laws & Industial Laws - I, Banking & Finance - I<br>**Skill Enhancement Course** (Opt Any One) : Self-Employment - I, Tax Procedure & Practice, Intellecual Property Right - I, Accounting & Tally, Financial Literacy Skills | Advance Accounting : Paper - II<br>Management Accounting: Paper - II<br>Auditing : Paper - II<br>**Group A-Taxation** : Goods and Service Tax, Project Work<br>**Group B Managemnt** : Marketing Mangement, Project Work<br>**Group C UGC Vocational Courses (TPP) : NA**<br>**Group D UGC Vocational Courses (FTPP) : NA**<br>**Group E UGC Vocational Courses Comp. App. : NA**<br>**Generic Elective** (Opt Any One) : Indian Economy - II, Labour Laws & Industial Laws - II, Banking & Finance - II<br>**Skill Enhancement Course** (Opt Any One) : Self-Employment - II, Tax Consultancy, Intellecual Property Right - II, Accounting & Auditing Practives, Mutual Fund Distribution |

**Choice Based Credit System and Range of Subject Option :**

As per the UGC directives, the SRTMU, Nanded is the first University in Maharashatra to Implement succesfully the CBCS pattern for the UG from the academic year 2016-17 and will be implemented progressively. The CBCS is a flexible system of learning that permits the students to learn at their own pace by choosing electives from the wide range of elective courses offered by the University. This offers an oppurtunity to develop an interdisiplinry approch in learning and to make the best use of the expertise of available faculty.

There is extra credit benefit for the NSS and the Spot subjects. The student can be awarded only one benefit either for the participation in the NSS or the Sport activities. NSS (2 grade points), the Sports - (0.15/0.200).

### B.A.

From the academic year 2016-17 the CBCS Pattern is Introduced by the SRTMU, Nanded. The choice of three optional subjects from the three groups is given below. They can choose any one from each group

**Group A** : Marathi / Hindi /English
**Group B** : Political Science / History
**Group C** : Economics / Public Administration / Physical Education

**B.A. : Structure of B.A. Programme under CBCS Pattern**

| Semester | Core Course 12 | Abiltiy Enhancement Compulsory Courses (AEC) (8) | Skill Enhancement Courses (SEC) (4) | Discipline Specific Elective DSE (6) | Generic Elective (6) |
|---|---|---|---|---|---|
| I<br>Credits : 24 | CC-A I<br>CC-B I<br>CC-C I | English<br>Comunication<br>SL | | | |
| II<br>Credits : 24 | CC-A II<br>CC-B II<br>CC-C II | English<br>Comunication<br>SL | | | |
| III<br>Credits : 26 | CC-A III<br>CC-B III<br>CC-C III | English<br>Comunication<br>SL | **SEC - I** | | |
| IV<br>Credits : 26 | CC-A IV<br>CC-B IV<br>CC-C IV | English<br>Comunication<br>SL | **SEC - II** | | |
| V<br>Credits : 29 | | * Environmental Studies | **SEC - III** | DSE - A I<br>DSE - B I<br>DSE - C I | GE - A I<br>GE - B I<br>GE - C I |
| VI<br>Credits : 29 | | | **SEC - IV** | DSE - A II<br>DSE - B II<br>DSE - C II | GE - A II<br>GE - B II<br>GE - C II |
| **Total Credits : 158** | **No. of Credits 72** | **No. of Credits 24** | **No. of Credits 8** | **No. of Credits 36** | **No. of Credits 18** |

**Note : A, B and C are optional Subjects**

## B.Com. : Structure of B.Com. Programme under CBCS Pattern :

| Semester | Core Course (12) | Abiltiy Enhancement Compulsory Courses (AEC) (8) | Skill Enhancement Courses (SEC) (4) | Discipline Specific Elective DSE (6) | Generic Elective (2) |
|---|---|---|---|---|---|
| I Credits : 21 | CC-A I CC-B I CC-E I | English Comunication SL | | | |
| II Credits : 21 | CC-A II CC-B II CC-E II | English Comunication SL | | | |
| III Credits : 26 | CC-A III CC-B III CC-E III | English Comunication SL | **SEC - I** | | |
| IV Credits : 26 | CC-A IV CC-B IV CC-E IV | English Comunication SL | **SEC - II** | | |
| V Credits : 23 | | * Environmental Studies | **SEC - III** | DSE - A I DSE - B I DSE - C I | GE - A I |
| VI Credits : 23 | | | **SEC - IV** | DSE - A II DSE - B II DSE - C II | GE - A II |
| **Total Credits : 140** | **No. of Credits 66** | **No. of Credits 24** | **No. of Credits 8** | **No. of Credits 36** | **No. of Credits 6** |

**Note : A, B and C are optional Subjects**

## पदव्युत्तर विभाग

### M.A. History (I Year / II Year)

एम.ए. (I Year) :
१) पेपर – १ : इतिहास लेखनशास्त्र
२) पेपर – २ : प्राचीन भारताचा इतिहास
३) पेपर – ३ : मध्ययुगीन भारताचा इतिहास
४) पेपर – ४ : मोगलांचा इतिहास

एम.ए. (II Year) :
१) पेपर – १ : महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारकांचा इतिहास
२) पेपर – २ : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
३) पेपर – ३ : मराठ्यांचा इतिहास
४) पेपर – ४ : विसाव्या शतकातील जग

## कनिष्ठ महाविद्यालय अभ्यासक्रमाची रूपरेषा

### कलाशाखा

| | | | |
|---|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | १) | इंग्रजी |
| | | २) | मराठी |
| | | ३) | हिंदी |
| | | ४) | राज्यशास्त्र |
| | | ५) | इतिहास |
| | | ६) | पर्यावरण शिक्षण |
| | | ७) | शारीरिक शिक्षण |
| ऐच्छिक विषय | : | १) | अर्थशास्त्र/सहकार |

### वाणिज्य शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | १) | इंग्रजी |
| | | २) | पर्यावरण शिक्षण |
| | | ३) | शारीरिक शिक्षण |
| व्दितीय भाषा | : | १) | मराठी /हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | १) | अर्थशास्त्र |
| | | २) | वाणिज्य संघटन |
| | | ३) | सचिवाची कार्यपध्दती |
| | | ४) | पुस्तपालन व लेखाकर्म |

### विज्ञान शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | १) | इंग्रजी |
| | | २) | पर्यावरण शिक्षण |
| | | ३) | शारीरिक शिक्षण |
| व्दितीय भाषा | : | १) | मराठी/हिंदी |
| ऐच्छिक विषय | : | १) | भौतिकशास्त्र |
| | | २) | रसायनशास्त्र |
| | | ३) | जीवशास्त्र |
| | | ४) | गणित किंवा अर्थशास्त्र |

# प्राध्यापक वृंद

## वरिष्ठ विभाग

प्राचार्य

**डॉ. श्रीरामे ए.एच.**

एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी.

| विभाग | नाव | शैक्षणिक अर्हता | पदनाम |
|---|---|---|---|
| मराठी विभाग | प्रा.डॉ. कांबळे एस.एल.<br>प्रा.डॉ.शिवशेट्टे एन.ए. | एम.ए.,, एम.फिल., पीएच.डी., नेट.<br>एम.ए., बी.एड., एम.फिल.,नेट.,पीएच.डी. | विभाग प्रमुख<br>सहाय्यक प्राध्यापक |
| हिंदी विभाग | प्रा.डॉ. जाधव डी.बी.<br>प्रा.डॉ.शिंदे पी.बी. | एम.ए., पी.एच.डी., नेट.<br>एम.ए.,बी.एड.,एम.फिल.,पीएच.डी.,सेट,नेट. | विभाग प्रमुख<br>सहाय्यक प्राध्यापक |
| इंग्रजी विभाग | प्रा.डॉ. सय्यद ए.आर. | एम.ए., बी.एड., पीएच.डी. | विभाग प्रमुख |
| राज्यशास्त्र विभाग | प्रा.डॉ.बेलखेडे एम.बी.<br>प्रा.डॉ.गायकवाड आर.जे. | एम.ए.बी.एड., एम.फिल., पीएच.डी., सेट<br>एम.ए., पीएच.डी. | विभाग प्रमुख<br>सहाय्यक प्राध्यापक |
| इतिहास विभाग | प्रा.डॉ.भद्रे एन.जी. | एम.ए., पीएच.डी. | विभाग प्रमुख |
| लोकप्रशासन विभाग | प्रा. मरकले एस.एच. | एम.ए., नेट, सेट. | विभाग प्रमुख |
| अर्थशास्त्र विभाग | प्रा.डॉ.मदनुरे व्ही. के. | एम.ए. एम.फिल., सेट., पीएच.डी. | विभाग प्रमुख |
| वाणिज्य विभाग | प्रा.डॉ.श्रीरामे ए.एच.<br>प्रा.डॉ.गोजे आर.सी.<br><br>प्रा.डॉ.चौधरी जी.पी.<br><br>प्रा.डॉ.इंगोले एम.एम. | एम.कॉम., एम.फिल., पीएच.डी.<br>एम.कॉम.,सेट.,पीएच.डी.,पी.जी.डी.बी.एम.<br>जी.डी.सी.ॲन्ड.ए.<br>एम.कॉम.,एम.फिल.,पीएच.डी., एम.बी.ए.,<br>पी.जी.डी.एच.आर.एम., डी.लिट्.<br>एम.कॉम., सेट, नेट., पीएच.डी. | प्राचार्य<br>विभाग प्रमुख<br><br>सहाय्यक प्राध्यापक<br><br>सहाय्यक प्राध्यापिका |
| क्रीडा विभाग | प्रा.डॉ.वाकरडकर एम.आर. | एम.पी.एड.,पीएच.डी. | क्रीडा संचालक |
| ग्रंथपाल | ------------ | ---------------- | ----------- |

## कनिष्ठ विभाग

| अ.क्र. | शिक्षकांची नावे | शैक्षणिक अर्हता | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री गाडवे एन.डी. | एम.ए.अर्थ., राज्य, बी.एड. | पर्यवेक्षक, अर्थशास्त्र शिक्षक |
| २. | डॉ. श्री चौधरी जी.आर. | एम.ए.,बी.एड.,पीएच.डी. | मराठी शिक्षक |
| ३. | श्री बैलके जी.पी. | एम.ए.,बी.एड. | अर्थशास्त्र शिक्षक |
| ४. | श्री गायकवाड एस.एल. | एम.एस्सी.,बी.एड.,एम.फिल. | भौतिकशास्त्र शिक्षक |
| ५. | श्री मटके एच.व्ही. | एम.ए.,बी.एड., एम.फिल. | राज्यशास्त्र शिक्षक |
| ६. | श्री कवडेकर एन.जी. | एम.ए.,बी.एड., एम.कॉम | हिंदी शिक्षक |
| ७. | श्री नागरगोजे डी.आर. | एम.एस्सी., बी.एड., एम.फिल., सेट | वनस्पतीशास्त्र शिक्षक |
| ८. | श्री किलबिले डी.पी. | एम.ए.बी.एड. | इंग्रजी शिक्षक |

## शिक्षकेत्तर कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री लाभशेटवार आर.एस. | एम.ए.,एम.फिल.,एम.लिब. | अधिक्षक |
| २. | श्री कुंटलवार ई.एन. | बी.ए. | वरिष्ठ लिपीक |
| ३. | श्री मंठाळे एस.एन. | बी.ए. | कनिष्ठ लिपीक |
| ४. | श्री अर्जुने ओ. आर. | एम.कॉम. | क.म.वि.प्रयोगशाळा सहाय्यक |
| ५. | श्री गायकवाड वाय.एस. | बी.ए. | ग्रंथालय परिचर |
| ६. | श्री यन्नावार एन.जी. | एच.एस.सी. | ग्रंथालय परिचर |
| ७. | श्री रेड्डी एस.पी. | एच.एस.सी. | क.म.वि.प्रयोगशाळा परिचर |
| ८. | श्री गादगे एम.एस. | एच.एस.सी. | ग्रंथालय परिचर |
| ९. | श्री सोबेकर टी.एम. | बी.ए. | सेवक |
| १०. | श्री शेख जवाद अली. एस. | बी.ए. | सेवक |

# महाविद्यालयात राबविले जाणारे उपक्रम

## सांस्कृतिक विभाग : प्रा.डॉ. गायकवाड आर. जे.

सांस्कृतिक सामाजिक बांधिलकीच्या पुनर्रचनेसाठी पानसरे महाविद्यालयाने १९७२ पासून खूप मोठे योगदान दिले आहे. बिलोली तालुक्यातीलच नव्हे तर नायगांव, देगलूर, धर्माबाद तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षीत व सुसंस्कारीत बनवून, त्यांच्यातील नैतिक ध्येयवादाबरोबरच राष्ट्रनिष्ठा, लोकशाहीविषयक आदर, धर्मनिरपेक्षता, मानवतावाद, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या मूल्यांचे महत्व प्रस्थापित करण्याचा प्रांजळ प्रयत्नही सांस्कृतिक विभागाने केला आहे. एवढेच नव्हे तर या परिसराला लाभलेल्या लोककलेचा व लोकसंस्कृतीचा वारसाही जोपासला आहे. या विभागाने महाराष्ट्राच्या लोकभूमिला दिलीप खंडेराय, मोहन गंगोने, कै.नितीन कवठाळे, सतिश जोशी,श्री आगलावे यासारखे नाट्य, नृत्य व संगीत क्षेत्रातील लोक कलावंत दिले आहेत. इथे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना अधिकाअधिक वाव देऊन त्यांच्यातील कला गुण विकसीत केले जातात. बौध्दिक विकासाबरोबरच कलात्मक आणि सांस्कृतिक विकास करणे हे या विभागाचे ध्येय आहे. आजपर्यंत या विभागाने महाराष्ट्रातील थोर साहित्यिक, नाट्यकलावंताना बोलावून त्यांचे मार्गदर्शन घेतलेले आहे. महाराष्ट्रात गाजलेली अनेक नाटके सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयात सातत्याने सादर झाली आहेत. निबंध, नाटक, एकांकिका, काव्यवाचन, कथाकथन, नृत्य, संगीत, वाद-विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यातून विद्यार्थ्यांना अनेक राज्यस्तरीय पारितोषिकंही मिळविले आहेत. आपल्या परिसराचा सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक स्तर उंचावण्याचा व तो वारसा जपण्याचा प्रयत्न युवास्पंदन या कार्यक्रमाव्दारे अविरत केला जातो. तसेच सांस्कृतिक विभागाच्या वतीने हुतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या पुण्यस्मरणार्थ महाविद्यालयात दरवर्षी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केल्या जाते.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षात महाविद्यालयात सांस्कृतिक विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला ज्यात प्रामुख्याने देशातील समाज सुधारक व राष्ट्रीय नेते यांच्या जयंती व पुण्यतिथीचा कार्यक्रम आयोजीत करून त्यांना मानवंदना व श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग होतो.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या श्री गुरुगोबिंदसिंघजी अध्यासन संकुल व संशोधन केंद्राच्या वतीने वीर बालदिवसाचे औचित्य साधुन आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत **चार साहेबजादो का बलीदान : एक अद्वितीय मिसाल** या विषयावर पाठविलेल्या निबंधास **कु. गायत्री मंडगे** या विद्यार्थीनीस **प्रथम पारितोषिक** आणि **कु. प्रणिता पटवेकर** या विद्यार्थीनीस **तृतीय पारितोषिक** प्राप्त झाले आहे.

कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी आयोजीत कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत **कृष्णा रामगिरवार प्रथम** व **कु. नक्षत्रा गाजेवार** या विद्यार्थीनीस **उत्तेजनार्थ** पारितोषीक प्राप्त झाले आहे.

श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर येथे आयोजीत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडास्तरीय निबंध लेखन स्पर्धेत **कु. पुजा मामीडवार** या विद्यार्थीनीने **व्दितीय पारितोषिक** प्राप्त केले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना : प्रा.डॉ. जाधव डी. बी., प्रा.डॉ. शिंदे पी. बी.

महाविद्यालयीन जीवनापासून विदयार्थ्यांच्या मनात समाजाविषयी सामाजिक जाणीव आणि बांधिलकी निर्माण करण्यासाठी व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे दिनांक २४ सप्टेंबर १९६९ पासून राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात झाली. आज महाराष्ट्रात पाच लाख चाळीस हजार आठशे स्वयंसेवक रासेयो मध्ये सहभागी आहेत.

**राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश :-** भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सूचनेनुसार डॉ. सी.डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समिती नेमण्यामागचा प्रमुख उददेश उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थी व युवकांचे राष्ट्राच्या उभारणीमध्ये योगदान असावे, यासंबंधी योजना तयार करणे हा होता. या समितीने अनेक देशातील युवकांशी संबंधित धोरणाचा अभ्यास करून राष्ट्रीय सेवा योजनेची सूचना केली होती. अशाच पध्दतीची शिफारस कोठारी आयोगाने १९६४ ते १९६५ मध्ये सूचविली होती. त्यानुसार स्वयंसेवी स्वरूपामध्ये एक कार्यक्रम दिला होता. ज्यामध्ये नॅशनल कॅरेट कोर (एनसीसी) याच आधारावर समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची सूचना केली गेली.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे चिन्ह :-** राष्ट्रीय सेवा योजनेचे चिन्ह हे ओडिशा राज्यातील कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित आहे. चक्र हे गतीचे प्रतीक आहे. माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे या योजनेचे बोधवाक्य आहे. ते आपणाला लोकशाही, सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देते. नि:स्वार्थ सेवेची गरज दाखवून देते. या बोधवाक्यात दुसऱ्या व्यक्तीचा दृष्टिकोन विचारात घेतला पाहिजे, हे सूचित होते.महात्मा गांधी यांच्या विचारांना राबविण्यासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने सरू झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० विद्यार्थ्यांचे एक युनिट महाविद्यालयांमध्ये वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होऊन अथकपणे कार्यरत असते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विदयार्थ्यांमध्ये सहकार्याची वत्ती, श्रद्धाभाव, उच्च धेय्यवाद, चिकाटी, समाजाप्रती बांधिलकी, विनयशीलता, अभ्यासू वत्ती, त्यागाची भावना, आदर्श व्यक्तिमत्व आणि प्रचंड इच्छाशक्ती आदी विविध गुणांचा विकास करण्यावर महाविद्यालयातील

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून भर दिला जातो.

**नियमित कार्यक्रम :-** राष्ट्रीय सेवा योजना मध्ये स्वयंस्फर्तीने सहभागी झालेल्या १०० विद्यार्थ्यांना महाविद्यालय परिसर तसेच दत्तक घेतलेल्या ग्रामीण भागात एका शैक्षणिक वर्षात १२० तास समाजसेवेचे काम करणे आवश्यक असते या कार्यक्रमांतर्ग परिसरातील स्वच्छता अभियान, पोलिओ सबंधि मार्गदर्शन, रोगप्रतिबंधक लसीकरण, ग्रामसफाई, साक्षरता, कोरोना महामारीत घ्यावयाची काळजी, कोविड लसीकरण संबंधित जनजागृती अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये समाजाप्रती आपलत्लरकी आणि बांधिलकीची जाणीव करून देण्यात येते. २०२२–२०२३ हे वर्ष संपूर्ण भारतात आजादी का अमत महोत्सव म्हणून साजरे करण्यात आले. या अंतर्गत १२ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान तिरंगा रॅली, रस्ते सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले. दिनांक १६ ते २२ ऑगस्ट रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश शिंदे यांनी ९। अहमदनगर येथील ट्रेनिंग यशस्वी पूर्ण केली आणि २०२२–२०२३ साठी त्यांची विद्यापीठाने विभागीय समन्वयक म्हणून नियुक्ती केली. २४ सप्टेंबर २०२२ रोजी रासेयो स्थापना दिवसानिमित्त प्रा. शंकर मरकले यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. दिनांक १७/१०/२०२२ रोजी मुंबई येथील स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमान व्हेगन आउटरिच ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला. दिनांक ०८ आक्टोंबर २०२२ रोजी नवीन मतार नोंदणी कार्यशाळा आयोजित करण्यात आली यामध्ये ६९ नवमतदारांनी नावनोंदणी केली. महाविद्यालयातील रासेयो विभागाचा कृष्णा रामगिरवार याची दिनांक १९ ते २२ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे आव्हान कॅम्प साठी विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून निवड झाली. तसेच २९ डिसेंबर २०२२ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठादवारे गुरुगोविंद सिंग यांच्या जयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत स्वयंसेविका क. गायत्री मंडगे ही विद्यापीठातून सर्वप्रथम आली. दिनांक २० ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत विदयापीठाची मशाल रॅली अर्जाप्र येथील हतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या समाधिस्थळापासून आरंभ झालो. या मशात्र रॅली मध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून महाविद्यालयातील डॉ. मदनुरे व्ही. के. आणि रासेयो विभागीय समन्वयक डॉ. प्रकाश शिंदे यांची नियुक्ती विद्यापीठाने केली. दिनांक २० मार्च २०२३ रोजी महाविद्यालयात रासेयो विभागाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन रासेयो विभागाने केले.

**विशेष शिबीर कार्यक्रम :-** राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या सात दिवसीय शिबिरात सहभागी होणे आवश्यक असते हे शिबिर महाविद्यालयातर्फे दत्तक घेतलेल्या गावी निवासी स्वरूपाचे असते. प्रस्तुत शिबिरामध्ये प्राध्यापक, विद्यार्थी, ग्रामस्थांच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवून सामाजिक व सांस्कतिक कार्यक्रमातून उद्बोधन घडवून आणले जाते. शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये बिलोली तालुक्यातील मोजे कार्ला (खुर्द) या गावी विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन दिनांक ०१ जानेवारी २०२३ ते ०७ जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले होते. युवकांचा ध्यास ग्राम–शहर विकास विशेष युवक शिबिर उद्घाटन सत्रात बिलोली चे तहसीलदार डॉ. निळे साहेब तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते तर समारोपाच्या दिवशी माननीय दिलीप कलकर्णी उपस्थित होते. या सात दिवसीय शिबिरामध्ये संस्थेचे उपाध्यक्ष राजेश्वर शेठ उत्तरवार साहेब यांनी दिलेल्या १५० फख रोपट्याची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाधिकारी डॉ. जाधव आणि डॉ. शिंदे यांनी या सात दिवसीय विशेष शिबिराचे यशस्वी नियोजन केले.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांना होणारे फायदे :-** राष्ट्रीय सेवा योजना मध्ये सहभागी होणाऱ्या निवडक विद्यार्थ्यांना देशाची राजधानी दिल्ली तसेच महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी होता येते. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी गणेश अशोक मेहत्री यांनी मुंबई येथे सहभाग नोंदवला होता तसेच उत्कृष्ट राष्ट्रीय स्वयंसेवक म्हणून महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी माधव हळदेकर यांनाही विद्यापीठाचा प्रस्कार प्राप्त झाला होता. याशिवाय राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून प्रमाणपत्र देऊन गोरविण्यात येते तसेच जे विद्यार्थी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवतात त्यांना अंतिम वर्षाच्या गुणपत्रकात अतिरिक्त दहा गुण दिले जातात. सर्वात महत्वाचे म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा स्वयंपूर्ण होऊन स्वतःमध्ये समाजाविषयी आदराची भावना निर्माण करतो हा समाजासाठी आणि विदयार्थ्यांसाठी सर्वात महत्त्वाचा फायदा आहे. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी. राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. जाधव डी. बी. डॉ. शिंदे पी. बी.

## क्रीडा विभाग : प्रा.डॉ. वाकरडकर एम.आर.

महाविद्यालयाच्या परिसरात विस्तीर्ण असे क्रीडांगण, शिवाय जिमखाना असून सर्व सोयींनी युक्त आहे. तसेच सांघीक व मैदानीक्रीडा साहित्य उपलब्ध आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाबरोबरच त्यांच्या शारीरिक विकासासाठी क्रीडा निपुण विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या खेळात स्पर्धेत भाग घेण्यासाठी महाविद्यालयाच्या मैदानावर नियमित सराव व मार्गदर्शन दिले जाते. क्रीडा विभागाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी विद्यापीठीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये नैपुण्य मिळवून महाविद्यालयाचे नावलौकिक केले व करीत आहेत. विविध सांघीक व मैदानी स्पर्धेत मिळविलेले खेळाडू पोलीस दल, SRP, BSF विभागात अनेक पदांवर कार्यरत आहेत.

पियुष घोलम भारतीय खो–खो संघामध्ये समावेश. अदमनकर रामचंद्र लक्ष्मण, गायकवाड मिनाक्षी राम या विद्यार्थीनीने राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक. दोन खेळाडूंनी आंतरमहाविद्यालय, अश्वमेध, आंतरविद्यापीठ मॅराथान इ. मैदानी स्पर्धेत गोल्ड व सिल्व्हर मेडल प्राप्त केले आहेत. तसेच M.P.S.C परीक्षेत महाविद्यालयाचे तीन खेळाडू

१. गायकवाड गंगाधर (PSI) २. चौधरी गजानन (PSI) ३. कु. मलकुलवार लक्ष्मी गंगाधर (PSI) म्हणून निवड झाली आहे.

पानसरे महाविद्यालय
अर्जापूर

# क्रीडा विभाग

## : सन २०२२-२३ या वर्षातील विविध क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश :

### पश्चिम विभागीय व अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय स्पर्धा

- **प्रणव अडबलवार** आणि प्रशांत देशपांडे यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पुरूष टेबल टेनिस स्पर्धेत आर.जी.पी.व्ही.भोपाळ येथे सहभाग (दि.२०–२४ डिसेंबर २०२२)
- विष्णु लव्हाळे यांची राष्ट्रीय स्तरावरील आंतरविद्यापीठ ॲथलॅटीक स्पर्धेत शारीरिक आणि क्रीडा विद्यापीठ चेन्नई (तामिळनाडू) येथे सहभाग (दि.९–१२ जानेवारी २०२३)
- दत्ता गोरगले यांची राष्ट्रीय स्तरावरील पुरूष मलखांब स्पर्धेत राजा महिंद्र प्रतापसिंग स्टेट युनिव्हसिटी अलिगड यांची निवड झाली होती (दि.२२–२५ जानेवारी २०२३)
- शेख अय्याज यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर पुरूष हॉकी स्पर्धेत आय.टी.एम. युनिर्व्हसिटी ग्वॉलियर येथे सहभाग (दि.२२–२५ जानेवरी २०२३)
- खुशाली गांगुर्डे व करूणा गाडे यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला वेट लिफ्टींग स्पर्धेत कालिकत विद्यापीठ येथे निवड (दि.११–१३ फेब्रुवारी २०२३)
- विद्यापीठ पॉवर लिफ्टींग स्पर्धेत क्रेंद्रीय विद्यापीठ हिमाचल प्रदेश येथे निवड (दि.९–१२ मार्च २०२३).
- दुर्गेश सुर्यवंशी यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर पुरूष वेट लिफ्टींग स्पर्धेत चंदीगड विद्यापीठ चंदीगड येथे निवड झाली (दि.१४–१८ मार्च २०२३).

### सी-झोन आंतर महाविद्यालयीन स्पर्धा

- १० कि.मी. "सी" झोन आय.सी.टी. स्पर्धेत **विष्णु लव्हाळे** यांनी क्रांस कंट्रीत **सुवर्णपदक** मिळविले.
- १० कि.मी. "सी" झोन आय.सी.टी. स्पर्धेत **मारूती वडजे** यांनी क्रांस कंट्रीत **रौप्यपदक** मिळविले.
- **जनरल चॅम्पियनशिप स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघानी रोप्यपदक मिळविले.**
- "सी" झोन आय.सी.टी. **टेबल टेनिस स्पर्धेत** प्रणव अडबलवार व प्रसाद देशपांडे यांनी विजय मिळवीला.
- "सी" झोन आय.सी.टी. **मलखांब** स्पर्धेत दत्ता गोरगले यांनी **सुवर्णपदक** मिळविले.
- "सी" झोन आय.सी.टी. **ॲथलेटीक्स** (१००00 मी. व ५000 मी.) या स्पर्धेत **विष्णु लव्हाळे यांनी सुवर्णपदक** मिळवीले.
- "सी" झोन आय.सी.टी. **ॲथलेटीक्स** (१५00 मी.) या स्पर्धेत **मारूती वडजे** यांनी सुवर्णपदक व (५000 मी.)स्पर्धेत **कांस्यपदक** मिळवीले.
- "सी" झोन आय.टी.सी. **हातोडा फेक** स्पर्धेत शेख जमीर याने **सुवर्णपदक** मिळविले.
- "सी" झोन आय.टी.सी. **वेट लिफ्टींग पावर लिफ्टींग स्पर्धेत खुरशाली गंर्गुडे** यांनी **सुवर्णपदक** मिळविले.
- "सी" झोन आय.टी.सी. **वेट लिफ्टींग पावर लिफ्टींग** स्पर्धेत **करूना गाडे** यांनी **सुवर्णपदक** मिळविले.
- "सी" झोन आय.टी.सी. **वेट लिफ्टींग पावर लिफ्टींग** स्पर्धेत **दुर्गेश सुर्यवंशी** यांनी **सुवर्णपदक** मिळविले.
- "सी" झोन आय.टी.सी. **वेट लिफ्टींग पावर लिफ्टींग** स्पर्धेत **ऋषिकेश साबने** यांनी **सुवर्णपदक** मिळविले.

### सेंट्रल झोन विभागीय स्पर्धा

- **विष्णु लव्हाळे** यांनी **१० किलोमीटर क्रांस कंट्रीत** स्पर्धेत **व्दितीय** क्रमांक पटकाविला.
- **संघर्ष सोनकांबळे** यांनी ५० मी. **स्विमींग** स्पर्धेत **रौप्यपदक**, १०० मी. **स्विमींग** स्पर्धेत **सुवर्णपदक** व २०० मी. **आय.सी.टी.स्विमींग** स्पर्धेत **सुवर्णपदक** मिळवीले. (दि. 0१.१0.२0२२)
- **प्रशिक चित्ते** यांनी ५० मी. **स्विमींग** स्पर्धेत **सुवर्णपदक**, १०० मी. **स्विमींग** स्पर्धेत रौप्यपदक व २०० मी. **आय.सी.टी.स्विमींग** स्पर्धेत **सुवर्णपदक** मिळवीले. (दि. 0१.१0.२0२२)
- **प्रणव अडबलवार** व **प्रसाद** देशपांडे हे स्वामी विवेकानंद कॉलेज शिरूर ताजबंद येथील **टेबील टेनिस** स्पर्धेतील **विजेते** (दि. ११–१२. नोव्हेंबर २०२२)
- **गोरगले दत्ता** यांनी दयानंद कॉलेज लातूर येथील **मलखांब** स्पर्धेत **सुवर्णपदक** मिळविले. (दि. १४.११.२0२२)

### स्पर्धा आयोजन पानसरे महाविद्यालय अर्जापूर

- क्रॉस कंट्री सी–झोन स्पर्धेचे आयोजन : मुले व मुली (दि. २७.0९.२0२२)

हु.गो.पानसरे शिक्षण प्रसारक मंडळाचे

# पानसरे महाविद्यालय, अर्जापूर



Parag Offset # 9422170025




ग्रंथालय

मुलींचे वसतीगृह







मुलांचे वसतीगृह